# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

**नांदेड येथील शासकीय रुग्णालयात निवासी डॉक्टरला रुग्णांच्या नातेवाईकांनी मारहाण केल्याबाबत**

**(१) ५५४५६ (३०-०८-२०१६). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथील सरकारी रुग्णालयात निवासी डॉक्टरला रुग्णांच्या नातेवाईकांनी मारहाण केल्याचा प्रकार दिनांक २९ एप्रिल, २०१६ रोजी घडला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णांच्या नातेवाईकांकडून सतत होणाऱ्या हल्ल्यांना वैतागलेल्या निवासी डॉक्टर संघटनेने मा. मुख्यमंत्री महोदयांकडे शस्त्रपरवाना देण्याची व डॉक्टर संरक्षण कायद्यात दुरुस्ती करुन हल्लेखोरांना ८ वर्षापर्यंत शिक्षेची तरतूद करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने या प्रकरणाची चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली तसेच डॉक्टरांवर होणारे हल्ले रोखण्यासाठी निवासी डॉक्टरांनी केलेल्या मागणीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०६-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मारहाण करणाऱ्या आरोपीस पोलीसांमार्फत तात्काळ अटक करण्यात आली असून गुरनं १४८/१६ कलम ३५३ भादंवि व महाराष्ट्र वैद्यकीय सेवा अधिनियम, २००० कलम ३ व ४ नुसार कार्यवाही करुन त्याबाबत दोषारोपपत्र मा. न्यायालयात दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील डॉक्टरांवर होणारे हल्ले रोखण्याकरिता वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय आणि संबंधित अधिष्ठांतामार्फत यांच्या स्तरावरुन रुग्णालयातील सुरक्षा व्यवस्थेबाबत आवश्यक उपाययोजना केलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासकीय रुग्णालयातील निवासी डॉक्टरांच्या आरोग्याच्या समस्येबाबत**

**(२) ५७९५१ (३०-०८-२०१६). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय रुग्णालयात रुग्णांची वाढती संख्या कामाचे वाढीव तास तर कधी कधी रुग्णांच्या नातेवाईकांकडून होणाऱ्या मारहाणीच्या घटना यामधून काही वर्षात निवासी डॉक्टरांमधील निर्माण झालेल्या ताणतणावामुळे चार ते पाच डॉक्टरांनी आत्महत्या केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामाचे वाढीव तास व वाढत्या तणावामुळे ४० ते ४५ डॉक्टरांना टी.बी. रोगाची लागण झाल्याचे निदर्शनास आल्यामुळे डॉक्टरांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कामाचे वाढीव तास तसेच वाढता ताणतणाव यामुळे निर्माण झालेल्या निवासी डॉक्टरांच्या आरोग्याच्या प्रश्नाबाबत शासन काय उपाययोजना करणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०६-२०१७) :**(१) नाही, हे खरे नाही.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) निवासी डॉक्टरांच्या कामाचा ताण कमी करण्याच्या अनुषंगाने संस्थास्तरावर कॉलेज कौन्सिलची बैठक आयोजित करुन त्या त्या विभागाच्या विभाग प्रमुखांमार्फत निवासी डॉक्टरांच्या दैनंदिन कामाचे नियोजन ठरविण्यात येते.

---

**मौजे अच्छाड (ता.डहाणू, जि.पालघर) येथील वन जमिनीवर अतिक्रमण केल्याबाबत**

**(३) ६६८६५ (२९-०१-२०१७). श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे अच्छाड (ता.डहाणू, जि.पालघर) येथील सर्व्हे क्र. १०१ मध्ये १३४५ एवढया क्षेत्रात संरक्षित वनामध्ये टिमा इंडिया प्रा.लि. कंपनीने बेकायदेशीररित्या सन २००८ मध्ये बांधकाम करुन शासकीय वन जमिनीवर अतिक्रमण करुन पक्की शेड उभारली असून ४४० मी. लांबीची पक्की भिंत बांधून संपूर्ण वनाचे क्षेत्रावर अतिक्रमण केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संरक्षित वनामध्ये केलेले बेकायदेशीर बांधकाम तोडण्याचे आदेश उप वनसंरक्षक विभाग, डहाणू यांनी दिनांक १५ फेब्रुवारी, २०१२ देऊनही आजतागायत सदरहू बांधकाम तोडण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सखोल चौकशी करुन अतिक्रमण करणाऱ्या टिमा इंडिया कंपनीविरुध्द वन क्षेत्र कायदयांतर्गत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०५-२०१७)** :(१) मौजे अच्छाड (ता.डहाणू, जि.पालघर) येथील वनक्षेत्रातील अतिक्रमण काढण्याबाबत कार्यवाही संबंधी उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र. १०१६१/२०१३ मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि. ६ फेब्रुवारी, २०१४ रोजी मिनट ऑफ ऑर्डर मध्ये संरक्षित वन सर्व्हे क्र. १०१ व संबंधित खाजगी क्षेत्राची संयुक्त मोजणी झाली आहे. परंतु अन्य सर्व्हे क्रमांकाची मोजणी अजूनही बाकी असल्याने मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडून अंतिम आदेश प्राप्त झालेले नाही.

सदर बाब सिव्हिल ॲप्लीकेशन व्दारे मा. उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणण्यास प्रधान मुख्य वन संरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना दिनांक ६.२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(२), (३) व (४) मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका प्रलंबित असल्याने आजतागयत सदरहू बांधकाम तोडणे शक्य झाले नाही.

---

## सोलापूर जिल्हयातील पाझर तलावाच्या बांधकामासाठी शासनाने ताब्यात घेतलेल्या जमिनीचा मोबदला मिळणेबाबत

**(४) ७२००१ (१६-१२-२०१६). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील सन १९७२ पासून पाझर तलाव बांधणेसाठी शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेतल्या व दुष्काळी परिस्थितीत शासनाच्या जलसंधारण व इतर विभागामार्फत बांधण्यात आलेल्या पाझर तलावाचा मोबदला स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी करूनही शेतकऱ्यांना देण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच सन १९७२ सालापासून शासनाच्या निरनिराळ्या विभागामार्फत सोलापूर जिल्हयातील प्रत्येक तालुक्यामध्ये किती पाझर तलाव बांधण्यात आलेले आहेत व त्यापैकी प्रत्येक तालुक्यातील किती शेतकऱ्यांना पाझर तलावाचा मोबदला द्यावयाचा राहिला आहे व आत्तापर्यंत किती शेतकऱ्यांना पाझर तलावाचा मोबदला मिळाला आहे,

(३) असल्यास, सर्व पाझर तलावाचा मोबदला शेतकऱ्यांना किती दिवसात देण्यात येईल ?

**प्रा. राम शिंदे (२०-०४-२०१७)** :(१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) अ) सोलापूर जिल्हयामध्ये लघुसिंचन (जलसंधारण) विभागाकडून ६५८ पाझर तलावांची कामे पुर्ण करण्यात आली आहेत. त्यापैकी ५२८ पाझर तलावांच्या भुसंपादनाची कार्यवाही पुर्ण होऊन भुसंपदानाचा मोबदला अदा करण्यात आला आहे. उर्वरित १३० पाझर तलाबांची भुसंपादन प्रक्रिया पुढीलप्रमाणे प्रगतीत आहे -

**१.** ६१ भुसंपादन प्रस्ताव :- शासनाच्या नवीन धोरणानुसार नियमीत पध्दतीने/खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी साठी सदर भुसंपादन प्रस्ताव संबंधित जिल्हाधिकारी व अधिकारी यांचेकडे सादर करण्यात आले आहेत.

**२.** १४ भुसंपादन प्रस्ताव :- संयुक्त मोजणीसाठी उपअधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय माढा यांचेस्तरावर आहेत.

**३.** ५४ भुसंपादन प्रस्ताव :- नवीन भुसंपदान कायदा सन २०१३ नुसार सदर भुसंपादन प्रस्ताव तयार करण्याचे काम उपविभागाकडे प्रगतीपथावर आहे.

**४.** ०१ भुसंपादन प्रस्ताव :- लघु पाटबंधारे तलाव मौजे हळदुगे (जगताप खोरे) ता.बार्शी या कामाचा समावेश नियोजन विभाग (रोहयो) अंतर्गत होतो. याबाबत भूसंपादन अधिनियम १८९४, कलम ११ नुसार अनुदान मागणी विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांच्या मार्फत नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

ब) सोलापूर जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषदे मार्फत एकुण १२३५ गाव व पाझर तलावांची कामे पुर्ण करण्यात आली आहेत. त्यापैकी १०६८ तलावांच्या भुसंपादानाची कार्यवाही पुर्ण होऊन भुसंपादानाचा मोबदला अदा करण्यात आला आहे. उर्वरित १६७ तलावांची भुसंपादान प्रक्रिया नवीन भुसंपादान कायदा, सन २०१३ नुसार पुढील प्रमाणे प्रगतीपथावर आहे -

**१.** ६० भुसंपादन प्रस्ताव :- शासनाच्या नवीन धोरणानुसार नियमीत पध्दतीने / खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी साठी सदर भुसंपादान प्रस्ताव संबंधित जिल्हाधिकारी व अधिकारी यांचेकडे सादर करण्यात आले आहेत.

**२.** १०७ भुसंपादन प्रस्ताव :- नवीन भुसंपादन धोरणानुसार भुसंपादन प्रस्ताव तयार करण्याचे काम जिल्हा परिषद विभागाकडील उपविभागाकडे प्रगतीपथावर आहेत.

वरील कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर सादर होणाऱ्या भूसंपादन निधी मागणी प्रस्तावावर सक्षम प्राधिकाऱ्यांकडून निधीच्या उपलब्धतेनुसार भुसंपादन मोबदला अदा करण्याबाबत त्वरेने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

### हिंगोली तालुक्यात एकात्मिक पाणलोट कार्यक्रमातंर्गत कंत्राटी कर्मचारी नियुक्ती मध्ये झालेला गैरव्यवहार

**(५) ७२०६० (१६-१२-२०१६). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली तालुक्यात एकात्मिक पाणलोट कार्यक्रमातंर्गत कंत्राटी कर्मचारी नियुक्ती प्रकरणी गैरव्यवहार झाल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला असुन दोन कर्मचाऱ्यांनी आत्महत्या करण्याचा इशारा दिल्याने माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियुक्ती करण्याच्या आदेशात गैरप्रकार झाल्यामुळे काही कर्मचारी नियुक्ती पासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२५-०५-२०१७) :**(१) होय.
(२) नाही.
(३) बी.व्ही.जी. इंडिया लि. या मनुष्यबळ सेवा पुरवठादार कंपनीकडून, कंत्राटी कर्मचारी घेण्यात आले असल्याने, प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाअंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविकांचे पाच महिन्यांपासून वेतन थकल्याबाबत**

**(६) ७२२८९ (१०-०१-२०१७). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाअंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविकांचे पाच महिन्यांपासून वेतन थकले असल्याचे दिनांक १४ ऑक्टोबर, २०१६ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंगणवाडी सेविकाला वेतन देयकासंबंधीच्या विलंबनाची कारणे कोणती,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व वेतन अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०४-२०१७) :**(१), (२), (३) व (४) चंद्रपूर जिल्हा परिषदेअंतर्गत एकूण १५ प्रकल्प असून त्यापैकी १४ प्रकल्पातील अंगणवाडी सेविकांचे मानधन नियमित अदा करण्यात आलेले असून केवळ बल्लारपूर प्रकल्पातील अंगणवाडी सेविकांचे मानधन अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीमधील तांत्रिक बिघाडामुळे उशिराने ऑक्टोंबर, २०१६ पर्यंत अदा करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत सर्व १५ प्रकल्पांचे माहे डिसेंबर, २०१६ पर्यंतचे मानधन अदा करण्यात आलेले आहे.

---

**विदर्भ व मराठवाडा येथे शासनाच्या वन जमीनीवर बेकायदेशीर अतिक्रमण झाल्याबाबत**

**(७) ७२२९२ (०९-०१-२०१७). श्री.रणजीत कांबळे (देवळी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भ व मराठवाडा येथे शासनाच्या वन जमीनीवर बेकायदेशीर अतिक्रमण झाल्याने महसुल बुडत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०३-२०१७) :**(१) माहे सप्टेंबर, २०१६ अखेर विदर्भ व मराठवाडा येथील २६,४९० हे. आर वनक्षेत्रावर अतिक्रमण आहे.

मात्र उक्त अतिक्रमणामुळे प्रत्यक्षरित्या शासनाचा महसूल बुडत आहे, हे खरे नाही.

(२) वन हक्क अधिनियम, २००६ च्या तरतूदीनुसार वैयक्तिक दावे प्रलंबित असताना अतिक्रमण निष्कासित करता येत नाही. ज्या अतिक्रमित वनजमिनीवर वन हक्क अधिनियम, २००६ अंतर्गत दावे मान्य करण्यात आले आहे अथवा दावे निर्णयासाठी प्रलंबित आहे, असे क्षेत्र वगळून उर्वरित वनक्षेत्रावरील अतिक्रमण निष्कासित करण्याबाबतची सूचना वन अधिकाऱ्यांना देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**किनगांवराजा (जि.बुलढाणा) पांग्री उगले येथील बालकांना अंगणवाडीत बसण्यासाठी जागा नसल्यामुळे पडक्या खोलीत बसावे लागत असल्याबाबत**

**(८) ७२४७२ (१०-०१-२०१७). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनगांवराजा (जि.बुलढाणा) पांग्री उगले येथील बालकांना अंगणवाडीत बसण्यासाठी जागा नसल्यामुळे पडक्या खोलीत बसावे लागत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०४-२०१७) :**(१), (२) व (३) प्रस्तुत प्रकरणी बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प, सिंदखेडराजा यांनी सादर केलेल्या अहवालानुसार किनगांवराजा (जि.बुलढाणा) पांग्री उगले येथील बालकांना बसण्यासाठी अंगणवाडी केंद्राची स्वतंत्र इमारत नसल्यामुळे त्यांचेकरीता जिल्हा परिषद शाळेची इमारत उपलब्ध करुन देण्यात आलेली असून सदर शाळेच्या इमारतीचे बांधकाम व्यवस्थित आहे. तसेच किनगांवराजा (जि.बुलढाणा) पांग्री उगले येथील केंद्राचे बांधकाम जिल्हा वार्षिक योजनेमधून करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भंडारा जिल्हयातील अंगणवाड्यात शौचालयाचे बांधकाम करणेबाबत**

**(९) ७२८९८ (१०-०१-२०१७). श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयात हजारावर अंगणवाडी केंद्र असून बहुतांश अंगणवाड्या एकात्मिक बालविकास प्रकल्पाच्या स्वत:च्या मालकीच्या इमारतीत असून तर काही भाड्याच्या इमारतीत सुरु असुन बहुतेक अंगणवाडी केंद्रात शौचालये नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास. शौचालये नसल्याने त्या अंगणवाडी केंद्रातील बालके माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान आजारी पडल्याची बाब निदर्शनास आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०४-२०१७)** :(१) भंडारा जिल्हयातील एकूण १३०५ अंगणवाडी केंद्रांपैकी ११९२ केंद्र प्रकल्पाच्या स्वत:च्या इमारतीत असून ७८ केंद्र भाडयाच्या इमारतीमध्ये सुरु आहेत. १३०५ केंद्रांपैकी ११८२ केंद्रांमध्ये शौचालये उपलब्ध आहेत.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर एकात्मिक पाणलोट विकास योजनेअंतर्गत जिल्हयात झालेल्या कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(१०) ७३४११ (१६-१२-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर एकात्मिक पाणलोट विकास योजनेअंतर्गत जिल्हयात झालेल्या कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेतंर्गत करण्यात आलेली कामे नेमलेल्या ठेकेदारांनी चुकीच्या ठिकाणी करण्यात आली असून माती व सिमेंट बंधारा कामात निम्मे पैसे खर्च केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू गैरव्यवहार कृषि विभागातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(५) तद्नुसार दोषीवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२५-०५-२०१७)** :(१) नाही, जून २०१६ मध्ये वृत्तपत्रात बातमी आली आहे.
(२) एकात्मिक पाणलोट विकास योजनेंतर्गत, एका सिमेंट नालाबांधाचे बांधकाम, नेमलेल्या ठेकेदाराने चुकीच्या ठिकाणी केल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) नाही.

(४) व (५) सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्या आदेशान्वये नेमलेल्या चौकशी समितीमार्फत मृद व जलसंधारण कामांची चौकशी करण्यात आली आहे.

अनियमिततेस जबाबदार असलेल्या अधिकारी / कर्मचारी व स्वयंसेवी संस्था यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या आहेत.

---

## बीड जिल्हयात सन २०१६-१७ मध्ये शासनाने निर्धारित केलेले वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट पूर्ण करण्याबाबत

**(११) ७३६८५ (०९-०१-२०१७). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयात सन २०१६-१७ मध्ये शासनाने किती वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट निर्धारित केले आहे,

(२) असल्यास, सदर वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट पूर्ण करण्याबाबत शासनाकडून कोणत्या उपाययोजना हाती घेण्यात आल्या वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-०४-२०१७) :**(१) बीड जिल्हयात सन २०१६-१७ मध्ये २४.६३ लक्ष वृक्ष लागवडीचे उद्दीष्ट शासनाने निर्धारित केले आहे.

(२) वृक्ष लागवडीचे उद्दीष्ट पूर्ण करण्यासाठी निरनिराळया योजनेंतर्गत सन २०१६-१७ मध्ये वन विभाग व सामाजिक वनीकरण विभाग यांचेमार्फत वृक्ष लागवडीचे काम पूर्ण करण्यात आले आहे. तसेच २ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत दिनांक १ जुलै, २०१६ रोजी वृक्ष लागवड कार्यक्रम हाती घेऊन शासनाचे विभाग, शाळा व अशासकीय संस्था तसेच लोकसहभागातून वृक्ष लागवडीचे उद्दीष्ट पूर्ण करण्यात आले आहे.

बीड जिल्हयात सन २०१६-१७ मध्ये एकूण २८.६७ लक्ष रोपांची लागवड साध्य करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खडकवासला (ता.हवेली, जि.पुणे) सिंहगड, पानशेत, वारजे भागातील विस्तीर्ण जंगलात वन्य प्राण्यांची बेसुमार शिकार, तस्करी व वृक्षतोड होत असल्याबाबत

**(१२) ७४३९७ (१७-०४-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकवासला (ता.हवेली, जि.पुणे) सिंहगड, पानशेत, वारजे भागातील विस्तीर्ण जंगलात गेल्या चार ते पाच महिन्यांत वन्य प्राण्यांची बेसुमार शिकार, तस्करी व वृक्षतोड सुरु असल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंहगड पायथ्याचे खानापूर येथील ब्रिटीश राजवट काळातील वनपरिक्षेत्र कार्यालय पुण्यामध्ये स्थलांतर झाल्याने दोनशे किमी अंतरातील सिंहगड पासून रायगड जिल्ह्याच्या हद्दीमध्ये असलेल्या जंगलात सुरक्षा व्यवस्था नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले वा त्यानुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०६-२०१७)** :(१) हे खरे नाही.

पूणे वनविभागाअंतर्गत वन्य प्राण्यांची बेसुमार शिकार, तस्करी, व वृक्षतोड सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले नाही. तथापी माहे जानेवारी २०१७ मध्ये भंबुर्डा वनपरिक्षेत्रात वारजे येथे वन्यप्राण्यासंबंधी दोन वनगुन्हे नोंदवले असून त्यात दोन नर चितळ भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात मृत्यू झालेले आहेत.
(२) पूणे वनविभागाची पुनर्रचना हेऊन ती दिनांक ०१.०९.२०१६ पासून अंमलात आलेली आहे. सदर पुनर्रचना तालुकानिहाय आहे. हवेली तालुक्याचे मुख्यालय पुणे येथे असल्याने सिंहगड परिसराचे मुख्यालय भांबुर्डा (पुणे) येथे कार्यरत आहे. रायगड जिल्हाचे क्षेत्र पुणे वनवृत्ताच्या कार्यकक्षेत येत नाही. तथापी रायगड जिल्हातील अलिबाग वनविभागातील खालापूर वनक्षेत्रात परिमंडळ खोपोली व उम्ब्रा व सुधागड वनक्षेत्रातील परिमंडळ कळंब, घोटवडे, नागशेत, पाच्छापूर, व कर्जत पूर्व वनपरिक्षेत्रातील परिमंडळ ढाक, खांडस व खांडपे यांच्या हद्दी पुणे वनविभागाला लागुन असून जंगल संरक्षणाकामी वनपाल कळंब, घोटवडे, नागशेत, पाच्छापूर, उम्ब्रा, खोपोली, ढाक, खांडस व खांडपे व सदर वनपाल यांच्या अधिपत्याखाली वनरक्षक कार्यरत आहेत. त्यामुळे कोणत्याही प्राण्याची शिकार, तस्करी व वृक्षतोड होउ नये म्हणून सुरक्षा व्यवस्था आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उंरदवाडी (ता.कागल, जि.कोल्हापूर) येथे गव्या रानरेड्यांनी केलेल्या शेतीची नुकसानभरपाई न मिळाल्याबाबत

**(१३) ७४४४७ (१७-०४-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उंरदवाडी (ता.कागल, जि.कोल्हापूर) येथे गव्या रानरेड्यांनी तेथील शेतकऱ्यांचे ३० ते ३५ एकर शेतीत लागत आणि खेडवा उसाचे नुकसान माहे डिसेंबर, २०१६ व जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत तेथील शेतकऱ्यांनी वन विभाग, कोल्हापूर यांच्याकडे निवेदनाद्वारे लेखी तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यात आली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०६-२०१७)** :(१) मौजे उंरदवाडी, ता. कागल येथे दिनांक १५.०१.२०१७ रोजी गवा या वन्यप्राण्यांनी २ शेतकऱ्यांच्या ५ गुंठे शेतीतील अंदाजे रु. २,४००/- इतक्या रक्कमेच्या शेतपिकाचे नुकसान केल्याचे निदर्शनास आलेले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उदभवत नाही.

(४) संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यानी अर्थसहाय्य मिळणेबाबत अर्ज सादर केलेला नाही. त्यामुळे अर्थसहाय्य देण्यात आलेले नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोकणात सिंधुदूर्ग जिल्हयात वन्यप्राण्यांकडून हल्ल्याचे प्रमाण वाढले असल्याबाबत**

**(१४) ७४६९३ (१७-०४-२०१७). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणात सिंधुदूर्ग जिल्हयात वन्यप्राण्यांकडुन हल्ल्याचे प्रमाण वाढले असल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दरवर्षी ५० च्या दरम्यान वन्यप्राणी हल्ल्याचे प्रकार घडतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जिल्यात वन्यप्राणी मानव संघर्षाच्या दृष्टीने हा गंभीर प्रकार असून भविष्यात याचा पर्यावरणाच्या संतुलनावरही परिणाम होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीअंती वन्यप्राण्याचे हल्ले रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०५-२०१७)** :(१) सिंधुदूर्ग जिल्ह्यात सन २०१६-१७ मध्ये मानव वन्यप्राणी संघर्षात मनुष्य जखमीच्या ५ घटना निदर्शनास आल्या असून प्रचलित शासन निर्णयाच्या तरतूदीनुसार संबंधिता नुकसानभरपाई म्हणून रक्कम रु. ६.१८ लक्ष अदा करण्यात आली आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) मानव वन्यप्राणी संघर्ष रोखण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

• मानव वन्यप्राणी संघर्ष रोखण्याच्या दृष्टीने वनअधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात येते.

• या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींकडून प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात येते.

• काही क्षेत्रात वनहद्दींवर वन्यप्राणी प्रतिबंधक चर खोदण्यात आले आहेत, तसेच सौर कुंपण तयार घालण्यात आले आहे.

• Rescue Team तयार करण्यात आली आहे.

• वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी उपाययोजना केल्या जातात.

• वनांवरील अवलंबन कमी करण्याच्या दृष्टीने सबसिडीवर एलपीजी गॅस शेगडी व सिलेंडर पुरवठा केला जात आहे.

• परिक्षेत्रस्तरावर क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत नियमित गस्त करण्यात येते.

---

## अहमदनगर जिल्हयातील औरंगाबाद रोडवरील वनविभागाच्या कार्यालय परिसरातील चंदनाची झाडे तोडल्याबाबत

**(१५) ७४८५३ (१७-०४-२०१७). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील औरंगाबाद रोडवरील वनविभागाच्या कार्यालय परिसरात १० ते १२ जणांनी रात्रपाळीला असलेल्या वन कर्मचाऱ्यांच्या मानेवर सुरा व करवत ठेवून ४ चंदनाची झाडे तोडून नेल्याची माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन अधिकाऱ्यांकडून सदर प्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वनविभागातून याआधी ही चंदनाची झाडे चोरीला गेलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीअंती चंदनाच्या झाडाची चोरी करणाऱ्यांवर तसेच त्यांना मदत करणाऱ्या वनविभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०५-२०१७) :**(१) दिनांक १.१.२०१७ रोजी पहाटेच्या दरम्यान १० ते १२ इसमांनी भिंगार रोपवाटीकेच्या बाहेरच्या गेट शेजारील भिरभिऱ्या गेट मधून आत प्रवेश केला. त्यापैकी ३ ते ४ इसमांनी रात्रपाळी संरक्षण करणाऱ्या ३ वनमजुरांना लाकडी दांडके व करवतीचा धाक दाखवून गप्प बसण्याची धमकी दिली व इतर ७ ते ८ इसमांनी चंदनाची २ झाडे तोडून नेली.

(२) अवैध वृक्षतोड व चोरीबाबत वनक्षेत्रपाल, अहमदनगर यांनी सदर प्रकरणी प्रथम रिपोर्ट रेंज गुन्हा क्र.सी-७ दिनांक १.१.२०१७ नोंदविला असून याबाबत दिनांक ५.१.२०१७ रोजी भिंगार कॅम्प पोलीस स्टेशनचे स्टेशन डायरीला नोंद करण्यात आली आहे.

(३) याआधी ३ वेळा चंदन झाडे चोरीची घटना घडली असून त्यामध्ये ४ झाडे चोरीस गेली आहेत. या तीनही घटना बाबत वनगुन्हे नोंदविणेत आले असून सदर तीनही गुन्हयातील आरोपीचा तपास चालू आहे.

(४) व (५) चंदन झाडाच्या चोरीबाबत वन विभागाच्या वतीने वनगुन्हे नोंदविण्यात आले आहेत. त्याबाबत वन विभागाचे वतीने चौकशी सुरु असून आरोपींचा शोध घेण्याचे काम सुरु आहे. याकामी वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी चंदन चोरास मदत केल्याचे निदर्शनास आलेले नाही म्हणून त्यांचेवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जुन्नर (जि.पुणे) येथील वन विभागातील मानव बिबट्या संघर्षाबाबत**

**(१६) ७५३८४ (१७-०४-२०१७). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्नर (जि.पुणे) येथील वन विभागातील मानव बिबटया संघर्षाच्या अनुषंगाने मा. वनेमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली सर्व संबंधितांची एक बैठक दिनांक ३ मे २०१६ रोजी मुंबईतील सहयाद्री अतिथीगृहामध्ये संपन्न झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बैठकीत जुन्नर येथील नावाजलेल्या व यापूर्वी १९९९ ते २००३ दरम्यानच्या तीव्र मानव बिबटया संघर्षात यशस्वीपणे मार्ग काढण्यासाठी वन विभागास संपूर्ण सहाय्य केलेल्या श्री. शिवछत्रपती महाविद्‌यालय, जुन्नर यांचेकडून वन विभागाने मागविलेला प्रस्ताव मंजूर करून वन विभागास त्याप्रमाणे निर्देश देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू बैठकीत घेतलेल्या निर्णयानुषंगाने अद्‌यापी निधी उपलब्ध करून देण्यात आलेला नसल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ जून २०१६ रोजी मा. वनेमंत्री यांना निवेदन सादर करून जुन्नर वन विभागास त्वरीत निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केलेली आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू मागणीनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०५-२०१७) :**(१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) सदर प्रस्तावात बिबट्यांचे अनुवंशिक क्रमबध्दता आणि बारकोडींग करणे, रेडीओ कॉलरींग, सनियंत्रण व जनजागृती इत्यादी कामे प्रस्तावीत आहे. सदर प्रस्तावाचे संस्करण प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे स्तरावर सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### भातसा पाटबंधारे प्रकल्पांतर्गत मुमरी धरणासाठीच्या वनजमिनीबाबत

**(१७) ७५६८६ (१७-०४-२०१७). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भातसा पाटबंधारे प्रकल्पांतर्गत मुमरी धरणाच्या वन जमीन वनेतर कामास देण्यासाठी केंद्र शासनाच्या वन व पर्यावरण मंत्रालयाची मंजूरी मिळाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यास महाराष्ट्र शासनाच्या वन व महसूल विभागाने वन विभागास सदर क्षेत्र जलसंपदा विभागास देण्यासाठी आदेशित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वनजमिन तातडीने वन विभागाने जलसंपदा विभागास हस्तांतरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०५-२०१७) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

केंद्र शासनाने दि.०२/०३/२००९ रोजीच्या पत्रान्वये काही अटींच्या अधीन राहून तत्वत: मान्यता व दि.०२/०५/२०१४ रोजीच्या पत्रान्वये अंतिम मान्यता दिली आहे. त्यास अनुसरुन महाराष्ट्र शासनाने दि.१९/०५/२०१४ रोजीच्या औपचारिक आदेशान्वये वनजमिन वळतीकरणास मंजूरी प्रदान केली आहे.

(३) मुमरी धरण प्रकल्पांतर्गत बाधित होणाऱ्या वनक्षेत्रातील वृक्षनिष्कासनाची कामे सुरु असून, सदर कामे पूर्ण होताच सदर वनक्षेत्र प्रकल्पाचे कामाकरिता जलसंपदा विभागास हस्तांतरीत करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सुरगाणा (जि.नाशिक) तालुक्यातील ठाणापाडा, बोरगाव, हतगड परिसरामध्ये मोठया प्रमाणात वृक्षतोड होत असल्याबाबत

**(१८) ७६७३० (१८-०४-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुरगाणा (जि.नाशिक) तालुक्यातील ठाणापाडा, बोरगाव, हतगड या परिसरामध्ये मोठया प्रमाणात वृक्ष तोड होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास या वृक्ष तोडीमुळे जंगल संपत्ती नष्ट होत असतांना देखील वन विभागाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास वृक्षतोडीस जबाबदार असलेल्या संबधित वनविभागाच्या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०५-२०१७) :**(१) सुरगाणा (जि.नाशिक) तालुक्यातील ठाणापाडा, बोरगाव, हतगड या परिसरामध्ये मोठया प्रमाणात वृक्षतोड होत असल्याची बाब माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आलेली नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**इगतपुरी (जि.नाशिक) तालुक्यातील वनविभागाअंतर्गत जलयुक्त शिवार योजनेची कामे अपात्र असलेल्या संस्थांना देण्यात आल्याबाबत**

**(१९) ७६७३१ (१७-०४-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपुरी (जि.नाशिक) तालुक्यातील वनविभागाअंतर्गत जलयुक्त शिवार योजनेची कामे ही निविदा प्रक्रिया पारदर्शक न राबविता पात्र संस्थेऐवजी अपात्र संस्थांना देण्यात आल्याची बाब माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची तक्रार वनविभाग तसेच मा. वने मंत्री यांचेकडे करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या तक्रारीनुसार अपात्र संस्थांना ही कामे देण्यात आली काय याची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व याप्रकरणी संबधित दोषींवर कारवाई करण्यात आली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.

मात्र सदर बाब दि.२८.१२.२०१६ रोजीच्या पत्रान्वये निदर्शनास आली आहे.

(२) हे खरे आहे.

याबाबत तुळजाभवनी मजूर व बांधकाम सहकारी संस्था मर्या., खैरगांव यांनी जलयुक्त शिवार अभियान कामातील निविदा प्रक्रीयेतील अपारदर्शकतेबाबत पत्र मा.मंत्री (वने) यांच्याकडे तक्रार केली आहे.या तक्रारीबाबत उपवनसंरक्षक, पश्चिम भाग नाशिक यांनी दि.१७.०४.२०१७ च्या पत्रान्वये सदर संस्थेस यामध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता झालेली नाही असे सविस्तर कळविले आहे.

(३) व (४) तुळजाभवानी मजुर बांधकाम सहकारी संस्था, खैरगांव या संस्थेच्या तक्रारीच्या अनुषंगाने कार्यालयीन समिती सदस्यांनी त्यांच्या तक्रारीचे निराकरण करुन त्यांना निविदेची दस्ताऐवजे समक्ष दाखवून ई-निविदा प्रक्रीयेबाबत सर्व संस्थांनी नियमितपणे कर भरल्याबाबत खातरजमा केली. त्यानूसार सर्वातकमी दराने निविदा भरणाऱ्या हरीजन कामगार सहकारी

संस्थेला सदरचे काम दिल्याचे स्पष्ट केले. तसेच नाशिक वनविभागाने गठीत समितीमार्फत सर्व कागदपत्राची शहानिशा केलेली असून तांत्रिक मुल्यांकनामध्ये कोणत्याही मजूर सहकारी संस्थेवर अन्याय केलेला नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ताडोबा व्याघ्र प्रकल्पाच्या कोर भागात नियमबाहय पध्दतीने डांबरी रस्ता तयार केल्याबाबत**

**(२०) ७७६२८ (१९-०४-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) व्याघ्र प्रकल्पाच्या कोअर भागात कोणत्याही प्रकारचे बांधकाम करण्यास मनाई असताना ताडोबा व्याघ्र प्रकल्पात मात्र या नियमाचा भंग करून कोअर भागात नियमबाह्य पद्धतीने डांबरी रस्ता तयार करण्यात आल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१७ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, सदर चौकशीत काय आढळून आले आहे आणि सदर प्रकरणात नियमबाह्य कृती करणाऱ्या संबधित अधिकाऱ्यांवर शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०६-२०१७) :**(१), (२) व (३) सर्व्हे ऑफ इंडियाद्वारे तयार करण्यात आलेल्या १९८० पूर्वीच्या टोपोशिटमध्ये जे रस्ते दाखविलेले आहे व त्या रस्त्याचे जे प्रकार दाखविले आहे अशा रस्त्यामध्ये अस्तित्वात असलेल्या रुंदीमध्ये दुरूस्ती व मजबुतीकरण करण्याकरीता वन संवर्धन अधिनियम १९८० अंतर्गत केंद्र शासनाच्या पूर्व परवानगीची गरज नाही. तसेच संरक्षित क्षेत्रातील रस्त्यांसाठी राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या परवानगीची आवश्यकता नाही.

ताडोबा व्याघ्र प्रकल्पाच्या कोअर भागातील मोहर्ली ते ताडोबा हा २०.०० किमी डांबरी रस्ता पूर्वीपासून अस्तित्वात आहे. सदर रस्ता दुरूस्तीचे कामात कोणत्याही नियमांचे किंवा वनसंवर्धन अधिनियम १९८० अंतर्गत तरतुदींचे उल्लंघन करण्यात आलेले नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पिसान्नी (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील वनपाल व वनरक्षक निवासस्थान बांधकामांची चौकशी करण्याबाबत**

**(२१) ७७८७२ (१७-०४-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिसान्नी (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील वनपाल व वनरक्षक निवासस्थान बांधकाम गैरव्यवहार प्रकरणी वनरक्षक, वनपाल व तत्कालिन रेंजर यांची विभागीय चौकशी करण्याचे आदेश कोल्हापूरचे उपवनसंरक्षक यांनी माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची चौकशी पूर्ण झाली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०६-२०१७) :**(१) एका वनरक्षकावर दोषारोप बजावण्यात आले आहेत. तसेच एक वनक्षेत्रपाल व एक वनपाल यांच्याविरूध्द दोषारोप बजावण्याची कार्यवाही सुरू आहे.

(२) अद्‌याप चौकशी पूर्ण झालेली नाही.

(३) व (४) चौकशीची कार्यवाही पूर्ण झालेली नसल्याने दोषींवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जिन्सी (ता.रावेर, जि.जळगाव) येथे वन विभागाच्या जमिनीवर**
**वन पर्यटन केंद्र सुरु करण्याच्या मागणीबाबत**

**(२२) ७७९८३ (१८-०४-२०१७). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिन्सी (ता.रावेर, जि.जळगाव) येथे वन विभागाच्या जमिनीवर वन पर्यटन केंद्र सुरु करण्यासाठी दिनांक ४ जुलै, २०१६ रोजी पत्राद्‌वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार शासनाने यावर अद्‌याप कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-०५-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) जिन्सी (ता.रावेर, जि.जळगाव) या स्थळाचा पर्यटन विकास आराखडा तयार करण्यासाठी उपवनसंरक्षक यावल यांनी प्रत्यक्ष मौका पाहणी केली असता ज्या क्षेत्रावर पर्यटन विकासाची कामे घ्यावयाची आहेत ते ४७४.३१ हे. वनक्षेत्र सद्‌यस्थितीत महसूल विभागाच्या ताब्यात आहे. सदरहू क्षेत्र वन विभागाच्या ताब्यात घेण्याच्या अनुषंगाने पाठपुरावा करण्यात येत आहे. उर्वरित जागेवर ९२ दावेदारांचे व इतर ३५ लोकांचे अतिक्रमण आढळून आले आहे. वनपरिक्षेत्र अधिकारी रावेर यांनी सदर अतिक्रमण काढण्याची कार्यवाही सुरु केली असता सर्व ग्रामस्थांनी त्यास विरोध केल्यामुळे संबंधित दावेदारांना दिवाणी प्रक्रीया कलम ८० अंतर्गत नोटीस देण्यात आली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता सदर क्षेत्रावर सद्यस्थितीत वन पर्यटन केंद्र विकसित करणे शक्य होणार नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहमदनगर जिल्हयातील अकोले व संगमनेर तालुक्यात २१ हून अधिक बिबट्यांचा मृत्यू झाल्याबाबत

**(२३) ७८०२० (१९-०४-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील अकोले व संगमनेर तालुक्यात २१ हून अधिक बिबट्यांचा मृत्यू झाल्याचे माहे डिसेंबर २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार वन्यप्राण्यांच्या मृत्यूला आळा घालण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०५-२०१७)** :(१), (२) व (३) अहमदनगर जिल्हयातील अकोले व संगमनेर या तालुक्यात माहे जानेवारी, २०१६ ते डिसेंबर, २०१६ या कालावधीत नैसर्गिकरित्या-७, विहिरीत पडून-५, अपघाताने-५ व आपसातील झुंजीत-५ असे एकूण २२ बिबट्यांचा मृत्यू झाला आहे.

वन्यप्राण्यांचे होणारे मृत्यू रोखण्याच्या दृष्टीने क्षेत्रियस्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

• वन्यप्राण्यांचे रस्ता अपघातात मृत्यू होऊ नये म्हणुन रस्त्याचे बाजुला, महत्वाच्या वळणावर सावधानतेचे फलक लावणेत आलेले आहे.

• बिबट प्रवण क्षेत्रातील गावात घडीपत्रिका वाटप करून सार्वजनिक ठिकाणी जनजागृतीसाठी पोस्टर्स लावण्यात आले आहेत.

• महसूल विभाग स्तरावर अपर विशेष पोलीस महानिरीक्षक व जिल्हा स्तरावर पोलीस अधिक्षक हे अध्यक्ष असलेले व्याघ्र कक्षांची निर्मिती करण्यात आली असून त्यामध्ये वन / वन्यजीव विभाग, विद्युत विभाग, रेल्वे पोलीस, इ. सदस्य आहेत.

• व्याघ्र कक्षाच्या सभेमध्ये व्याघ्र संरक्षणाबाबत समन्वयाने कार्यवाही करण्यात येत असते.

• जंगलामध्ये आवश्यक त्या ठिकाणी निरीक्षण मनोरे उभारण्यात आले आहेत.

• वन्यप्राण्यांच्या हालचालींचे सनियंत्रण ठेवण्याकरीता कॅमेरा ट्रॅप, जीपीएसचा वापर केला जातो.

• संरक्षित क्षेत्रातील नैसर्गिक पाणवठे, कृत्रिम पाणवठ्याची वनकर्मचाऱ्यामार्फत नियमित तपासणी करण्यात येते.

• शिकाऱ्याबाबत गोपनियरित्या माहिती संकलित करण्यात येते.

• संगमनेर उपवनविभागात २ रेस्क्यु पथके निर्माण करण्यांत आलेले असुन पथकातील कर्मचा-यांना विशेष प्रशिक्षण देण्यांत आलेले आहे.

• सदर पथकातील सदस्यांना वन्यप्राण्यास बेशुध्द करण्याकरिता विशेष ट्रॅन्क्युलायझिंग गन तसेच वन्यप्राण्यांची ओळख पटविण्याकरिता कॅमेरा ट्रप इत्यादि साहित्य उपलब्ध करुन देण्यांत आलेले आहे.

• ऊस शेतीमध्ये अधिवास करणाऱ्या बिबट्यांबाबत जनजागृती अभियान राबविण्यात आले आहे.

• वनक्षेत्रावर विविध योजनेतुन उपलब्ध अनुदानातून वनतळे /वनबंधारे /सिमेंट बंधारे/ पाणवठे इ कामे करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्हयातील काटोल तालुक्यामधील कोंढाळी वन परीक्षेत्रात सागाच्या झाडांची अवैध तोड करण्यात आल्याबाबत

**(२४) ७८४९० (१५-०४-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काटोल (जि.नागपूर) तालुक्यातील कोंढाळी वन परीक्षेत्रात २०० च्या वर सागाच्या झाडांची बेकायदेशीररित्या वृक्षतोड करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या सागाच्या वृक्षतोडीला वन परीक्षेत्र अधिकाऱ्यांनी परवानगी दिली असुन त्याची घटनास्थळी जाउन पाहणी न करता अवैध तोड एका खाजगी कंत्राटदारांकडुन करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, या वनपरीक्षेत्र अधिका-यांनी खसरा क्र १५४ वरील वन विभागाच्या जंगलाची पाहणी न करता खसरा क्र १५५/३ शेजारी वन विभागाचे कोणतेही जंगल नसल्याचे रीतसर प्रमाणपत्र दिले असुन त्यांचा फायदा घेउन संबंधीत ठेकेदारांनी सागाच्या झाडाची अवैध तोड केलेली आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, सदर प्रकरणी परवानगी देणाऱ्या वन परीक्षेत्र अधिकारी वन कर्मचाऱ्यांना संबंधीत ठेकेदारांच्या कामकाजाची सखोल चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०६-२०१७) :**(१) नागपूर वनवृत्तातील कोंढाळी वनपरिक्षेत्रात साग झाडांची अवैध वृक्षतोड झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आले.

(२) वनपरिक्षेत्र अधिकारी, कोंढाळी यांनी त्यांचेकडील दिनांक १६.१२.२०१६ चे आदेशान्वये महाराष्ट्र वृक्ष तोडीबाबत (विनियमन) १९६४ मधील तरतुदीनुसार श्री.प्रविण वासुदेव मुन्ने यांना साग प्रजातीचे ३३८ वृक्ष तोडण्याबाबत परवानगी प्रदान केली होती. तथापि, उक्त वृक्षांपैकी

सागाची १३४ वृक्ष लगत असलेले संरक्षित वन भूमापन क्र.१५४ मधील होते. वनरक्षक, वनपाल व वनपरिक्षेत्र अधिकारी, कोंढाळी यांनी प्रकरणी योग्य काळजी घेतली नसल्याने संरक्षीत वनक्षेत्रातील उक्त १३४ वृक्षांची तोड झाली असल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) वृक्ष तोडीची परवानगी दिलेले खाजगी भूमापन क्र.१५५/३ च्या लागूनच संरक्षित वन भूमापन क्र.१५४ आहे व त्यातील झाडे १३४ हे सुध्दा वृक्ष तोडीत परवानगीत अंतर्भूत आहे. याची शहानिशा वनसर्व्हेक्षक, संबंधित वनरक्षक, वनपाल व वनपरिक्षेत्र अधिकारी, कोंढाळी यांनी केली नसल्याने झाडांची अवैध तोड झाली आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(४) प्रस्तुत प्रकरणी योग्य काळजी घेतली नसल्याने संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपाल, वनरक्षक व वनसर्व्हेक्षक या शासकीय कर्मचाऱ्यांना निलंबीत करण्यात आले असून त्यांचेविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्हयातील देवपायली-बाळापूर परिसरात मोठया प्रमाणात वाघ व बिबटयांचा वावर असल्याबाबत**

**(२५) ७८७३३ (१७-०४-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील देवपायली-बाळापूर परिसरात मोठया प्रमाणात वाघ व बिबटयांचा वावर असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाघ व बिबटयांच्या वावरामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय,

(४) असल्यास, तदनुसार शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०६-२०१७)** :(१), (२) व (३) चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी वनविभागातील तळोधी परिक्षेत्रातील देवपायली-बाळापुर परिसरात माहे जानेवरी, २०१७ मध्ये दिनांक ०१.०१.२०१७ रोजी बिबट्याने शेळीवर हल्ला करुन ठार केल्याची घटना निदर्शनास आली आहे. त्या अनुषंगाने सदर परिसरात बिबट्याचा वावर असल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर पशुधन हानी प्रकरणात प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीच्या अनुषंगाने संबंधित नुकसानग्रस्त व्यक्तीस रु. ३,३७५/- इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे.

(४) मानव-वन्यप्राणी संघर्ष रोखण्याच्या अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर उपययोजना करण्यात येतात.

• कॉरिडोअर विकास कार्यक्रमांतर्गत TRACT या अशासकीय संस्थेद्वारे गावामध्ये प्रशिक्षण घेऊन मानव-वन्यप्राणी संघर्ष हाताळयांच्या अनुषंगाने गावकरी व क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येते.

• वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने वनक्षेत्रात कृत्रिम पाणवठे, वनतळी, वन बंधाऱ्याची निर्मिती करण्यात येऊन त्यात पाणी उपब्ध करुन देण्यात येते.

• मानव-वन्यप्राणी संघर्ष हाताळयांच्या अनुषंगाने वनकर्मचारी / अधिकारी यांना वन्यप्राण्यांना बेशुध्द (Tranquilize) करण्याचे प्रशिक्षण देण्यात येते.

• वनांवरील अवलंबन कमी करण्याच्या दृष्टीने सबसिडीवर एलपीजी गॅस शेगडी व सिलेंडर पुरवठा केला जात आहे.

• परिक्षेत्रस्तरावर क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत नियमित गस्त करण्यात येते.

• नियमित गस्तीद्वारे वन्यप्राण्यांच्या हालचालीचे संनियंत्रण करण्यात येते.

• ग्रामीण भागात विविध माध्यमातून जनजागृती करण्यात येते.

• वन्यप्राण्यांचे होणारे संभाव्य हल्यापासून योग्य ती खबरदारी घेणे व जंगलात न जाण्याबाबत सावधानातेचा इशारा दर्शक पोस्टर्स लावणेत आले आहेत.

• वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत झालेल्या व्यक्तीच्या कादेशीर वारसास, संबंधित जखमी व्यक्तीस, शेतपिक नुकसानी प्रकरणी संबंधित शेतकऱ्यास तसेच पशुहान हानी प्रकरणी संबंधित पशधनाच्या मालकास प्रचलित शासन निर्णयान्वये नुकसान भरपाई अदा करण्यात येते.

• आवश्यकता भासल्यास वन्यजीव संरक्षण (अधिनियम), १९७२ च्या नियमांतील तरतूदीच्या अनुषंगाने उपद्रवग्रस्त वन्यप्राण्याला पकडण्यासाठी पिंजरे लावण्यात येतात.

• ब्रम्हपूरी वन विभागामध्ये १८३ संयुक्त वनव्यवस्थापन समित्यांची स्थापना करण्यात आली असून अवश्यक त्या वेळी त्यांची मदत घेण्यांत येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### वन परिक्षेत्रातील गावालगत वावर असणा-या मोकाट व रानटी कुत्र्यांमुळे वन्य प्राण्यांना "केनाईन डिस्टेंपर" या व्हायरल आजाराची लागण होण्याची शक्यता

**(२६) ७८७४१ (१५-०४-२०१७). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वन परिक्षेत्रातील गावालगत वावर असणाऱ्या मोकाट व रानटी कुत्र्यांमुळे वन्य प्राण्याच्या जीवाला धोका निर्माण होऊन "केनाईन डिस्टेंपर" या व्हायरल आजाराची लागण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन्य प्राण्यांना व्हायरल आजारापासून वाचविण्याकरिता शासनाने कोणत्या प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या आहेत,

(३) असल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०५-२०१७) :**(१) व (२) वन परिक्षेत्रातील गावालगत वावर असणाऱ्या मोकाट व रानटी कुत्र्यांमुळे वन्य प्राण्याच्या जीवाला धोका निर्माण होऊन "केनाईन डिस्टेंपर" या व्हायरल आजाराची लागण झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

तथापि, राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण (NTCA) यांनी दिनांक १८.०६.२०१३ रोजी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनान्वये महाराष्ट्र राज्यातील सर्व प्रादेशिक व वन्यजीव विभागांना "केनाईन डिस्टेंपर" या व्हायरल आजारापासून वन्यप्राण्यांना वाचविण्याकरीता आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेबाबत यापूर्वीच सूचना देण्यात आल्या आहेत तसेच जेरबंद करण्यात आलेल्या वाघ व बिबटे तसेच मृत वन्यप्राण्यांच्या पोस्टमार्टम करतेवेळी "केनाईन डिस्टेंपर" या आजाराची चाचणी करण्याचे निर्देश देखील देण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जामडी लोधीटोला (जि.गोंदिया) गावातील जनतेला**
**रोजगार मिळण्यासाठी कामे सुरू करण्याबाबत**

**(२७) ७९१०४ (१७-०४-२०१७). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जामडी लोधीटोला (जि.गोंदिया) गावातील जनतेला वनविकास महामंडळ (एफ.डी.सी.एम) मार्फत वनपरिक्षेत्रात रोजगार निर्मितीची कामे मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.वने मंत्री व जिल्हाधिकारी (गोंदिया) यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी रोजगाराची कामे सुरू करण्यास दिनांक ७ सप्टेंबर, २०१६ चे महाराष्ट्र शासनाचे राजपत्रानुसार नागझीरा-नवेगांव व्याघ्र प्रकल्पाच्या बफरझोन घोषित झाल्यामुळे शासनाकडून कामाला मंजूरी मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०५-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२) व (३) दि. ७ सप्टेंबर २०१६ च्या अधिसुचनेनुसार गोंदिया वन प्रकल्प विभागातील १०३८०.५५ हे. वनक्षेत्र नागझीरा-नवेगाव व्याघ्य प्रकल्पाचे बफर क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे. सदर क्षेत्रात मंजूर व्यवस्थापन आराखड्यानुसार विकास कामे करण्यास केंद्र शासनाने काही अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूरी प्रदान केली आहे. त्यास अनुसरुन प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर यांनी दि. २०/४/२०१७ रोजी झालेल्या सभेत एनटीसीए (National Tiger Conservation Authority) च्या सुचनांचे पालन करण्याच्या अटीवर सदर बफर क्षेत्रामध्ये रोपवन, विरळणीकरण व बांबू निष्कासनाची कामे करण्यास परवानगी दिलेली आहे. त्यानुसार सदर क्षेत्रात विकास कामे सुरु करण्याची कार्यवाही चालू असून त्यानुसार स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद जिल्हयातील सिल्लोड तालुक्यात वन विभागात जनावरे पिकांचे नुकसान करत असल्याबाबत

**(२८) ७९४८२ (१५-०४-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील सिल्लोड तालुक्यात वन विभागात जंगली जनावरांची संख्या वाढल्याने वनविभागाच्या जवळील शेतात ही जनावरे पिकांचे नुकसान करतात तसेच शेतकऱ्यांच्या जिविताला धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने उपाय म्हणून वन विभागातील जमिनींना कुंपण करावे किंवा ज्या शेतक-यांच्या जमिनी वनविभागाला लागून आहे अशा शेतकऱ्यांना वार्षिक भरपाई द्यावी, याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०६-२०१७) :**(१), (२) व (३) औरंगाबाद जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यात सन २०१६-१७ मध्ये वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मनुष्य जखमीची २० प्रकरणे, शेतपिक हानीची ५० प्रकरणे तर पशुधन हानीची २० प्रकरणे झाल्याचे निदर्शनास आली असून प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार जखमी व्यक्तीस रु. १.२४ लक्ष, संबंधित पिक नुकसान झालेल्या शेतकऱ्यानां रु. १.३५ लक्ष तर संबंधित पशुधन नुकसानग्रस्त व्यक्तीस रु. १.२५ लक्ष रक्कम अदा करण्यात आली आहे.

सिल्लोड तालुक्यातील वनक्षेत्र हे विखूरलेल्या स्वरुपात आहे. त्यामुळे संपूर्ण वनक्षेत्रास सौर कुंपण करणे योग्य होणार नाही.

वन्यप्राण्यांपासून शेतपिकांचे नुकसान होऊ नये म्हणून डॉ. रुद्रादित्य यांनी करुन दाखविलेल्या विविध प्रात्यक्षिकामधून मिरचीच्या धुर प्रयोगाचे प्रात्यक्षिक जंगलालगत विविध ठिकाणी करण्यात आलेली आहेत. स्थानिक जनतेमध्ये वन्यजीवा बद्दल जनजागृती करण्यात येते. तसेच वन्यप्राण्यांपासून शेतपिकांचे नुकसान टाळण्यासाठी क्षेत्रिय स्तरावर वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येतात.

---

## नागभीड (जि.गडचिरोली) तालुक्यातील उश्राळमेंढा परिसरातील उसराळा या तलावाजवळ गावाला लागून असलेल्या परिसरात पट्टेदार वाघाने ६ जनावरे मारल्याच्या घटनेबाबत

**(२९) ७९८५६ (१९-०४-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागभीड (जि.गडचिरोली) तालुक्यातील उश्राळमेंढा परिसरातील उसराळा या तलावाजवळ गावाला लागून असलेल्या परिसरात पट्टेदार वाघाने ६ जनावरे मारल्याची घटना नुकतीच माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तात्काळ वाघाचा बंदोबस्त करावा अशी मागणी उश्राळमेंढा येथील ग्रामस्थांनी शासनाकडे केली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासन स्तरावर तात्काळ कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०६-२०१७) :**(१) जिल्हा चंद्रपूर, नागभिड तालुक्यातील उश्राळा मेंढा परिसरातील उसराळा तलावाजवळ दिनांक १६.०१.२०१७ रोजी १-गाय, दिनांक ३१.०१.२०१७ रोजी १-गाईचा गोरा वाघाच्या हल्यात ठार झाल्याच्या घटना निदर्शनास आलेल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) मानव-वन्यप्राणी संघर्ष रोखण्याच्या अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर उपाययोजना करण्यात येतात.

• कॉरिडोअर विकास कार्यक्रमांतर्गत TRACT या अशासकीय संस्थेद्वारे गावामध्ये प्रशिक्षण घेऊन मानव - वन्यप्राणी संघर्ष हाताळ्यांच्या अनुषंगाने गावकरी व क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येते.

• वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने वनक्षेत्रात कृत्रिम पाणवठे, वनतळी, वन बंधाऱ्याची निर्मिती करण्यात येऊन त्यात पाणी उपलब्ध करुन देण्यात येते.

• मानव-वन्यप्राणी संघर्ष हाताळ्यांच्या अनुषंगाने वनकर्मचारी / अधिकारी यांना वन्यप्राण्यांना बेशुध्द (Tranquilize) करण्याचे प्रशिक्षण देण्यात येते.

• वनांवरील अवलंबन कमी करण्याच्या दृष्टीने सबसिडीवर एलपीजी गॅस शेगडी व सिलेंडर पुरवठा केला जात आहे.

• परिक्षेत्रस्तरावर क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत नियमित गस्त करण्यात येते.

• नियमित गस्तीद्वारे वन्यप्राण्यांच्या हालचालीचे संनियंत्रण करण्यात येते.

• ग्रामीण भागात विविध माध्यमातून जनजागृती करण्यात येते.

• वन्यप्राण्यांचे होणारे संभाव्य हल्यापासून योग्य ती खबरदारी घेणे व जंगलात न जाण्याबाबत सावधानातेचा इशारा दर्शक पोस्टर्स लावणेत आले आहेत.

• वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत झालेल्या व्यक्तीच्या कादेशीर वारसास, संबंधित जखमी व्यक्तीस, शेतपिक नुकसानी प्रकरणी संबंधित शेतकऱ्यास तसेच पशुहान हानी प्रकरणी संबंधित पशधनाच्या मालकास प्रचलित शासन निर्णयान्वये नुकसान भरपाई अदा करण्यात येते.

• आवश्यकता भासल्यास वन्यजीव संरक्षण (अधिनियम), १९७२ च्या नियमांतील तरतूदीच्या अनुषंगाने उपद्रवग्रस्त वन्यप्राण्याला पकडण्यासाठी पिंजरे लावण्यात येतात.

• ब्रम्हपूरी वन विभागामध्ये १८३ संयुक्त वनव्यवस्थापन समित्यांची स्थापना करण्यात आली असून अवश्यक त्या वेळी त्यांची मदत घेण्यांत येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

___________

**घोट (ता.चामोर्शी, जि.गडचिरोली) येथे केंद्र शासनाच्या मानव विकास मंत्रालयामार्फत जवाहर नवोदय विदयालयाची स्थापना करण्याबाबत**

**(३०) ७९८८४ (२०-०४-२०१७). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोट (ता.चामोर्शी, जि.गडचिरोली) येथे केंद्र शासनाच्या मानव विकास मंत्रालयामार्फत जवाहर नवोदय विदयालयाची स्थापना करण्यात येवून नविन इमारतीचे जागेसाठी राज्य शासनाने ५ वर्षापासून १ कोटी ३३ लक्ष रक्कमेचा भरणा करून अदयापही जागा मंजूर न झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील ५ वर्षापासून जागा मंजूर न झाल्याने सदर विदयालयातील भौतिक सुविधांची पूर्तता झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्नोक्त भाग (१) बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०५-२०१७) :**(१) हे खरे आहे.

प्राचार्य, जवाहर नवोदय विद्यालय, घोट, गडचिरोली यांनी पर्यायी वनीकरण, दंडात्मक पर्यायी वनीकरण व नक्त वर्तमान मूल्याची म्हणून रुपये १,३३,७९,६६४/- इतकी रक्कम सदर प्रस्तावास केंद्र शासनाची तत्वत: मान्यता मिळण्यापूर्वी दिनांक ०३/०८/२०११ रोजी केंद्र शासनाच्या कॅम्पा खात्यामध्ये भरली आहे.

(२) सदर प्रस्तावास वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या तरतुदी लागू होत असल्याने केंद्र शासनाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. राज्य शासनाने सदर प्रस्ताव दिनांक १२/१०/२०१५ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक खुलाश्यासह केंद्र शासनास सादर करुन प्रस्तावास मान्यता देण्याची विनंती केली आहे.

(३) व (४) केंद्र शासनाने दिनांक ०६/१२/२०१६ रोजीच्या पत्रान्वये काही त्रुटी उपस्थित केल्या असून सदर मुद्द्यांचा पूर्तता अहवाल प्रकल्प यंत्रणेने अद्यापही सादर केलेला नाही.

---

**पाचोरा भडगांव (जि.जळगांव) तालुक्यातील अवैध वृक्षतोड थांबविण्याबाबत**

**(३१) ८०१५४ (१५-०४-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा भडगावतर्फे (जि.जळगाव) गिरणा तापी जनविकास पर्यावरण संस्थेने मोठ्या प्रमाणावर होणारी अवैध वृक्षतोड थांबवून त्यांचे जतन करण्याबाबत मा.वनेमंत्री यांना माहे आक्टोंबर, २०१६ मध्ये निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०६-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) धुळे वनवृत्तामध्ये जळगाव, धुळे, नंदूरबार, यावल व मेवासी असे एकूण ५ प्रादेशिक वन विभाग असुन धुळे वनवृत्ताचे कार्यक्षेत्र जळगांव, धुळे व नंदुरबार या तीन जिल्हयात आहे. यापैकी जळगाव जिल्हयातील तीन तालुक्यातील क्षेत्र आदिवासी बहूल क्षेत्रात येते. तर उर्वरीत बारा तालुक्यातील क्षेत्र गैर आदिवासी क्षेत्र आहे. धुळे वनवृत्तातील चांगल्या प्रतीचे जंगल हे आदिवासी बहूल क्षेत्रात असून गैर आदिवासी क्षेत्रातील वने ही कमी घनतेची असून सदर क्षेत्रामध्ये होणारी वृक्षतोड ही अत्यल्प आहे व साधारणपणे सरपणाकरीता केली जाते.

आदिवासी वनक्षेत्रावर अतिक्रमण करण्याकरीता सामुहिकरित्या प्रयत्न करण्यात आले आहेत. त्यामुळे वृक्षतोडीच्या प्रमाणात काहीअंशी वाढ झाली होती. तसेच वनकर्मचाऱ्यांवरही हल्ले करण्याच्या घटनांमध्येही वाढ झाली.

धुळे वनवृत्तामध्ये एक राज्य राखीव दलाची तुकडी ठेवण्यात आली आहे. तसेच क्षेत्रिय कर्मचाऱ्यांना एसएलआर रायफल व पिस्टुल देण्यात आलेल्या आहेत. याशिवाय वनवृत्तामध्ये ४ गस्ती पथक असून त्यांचा उपयोग नियमित गस्ती व वनसंरक्षण करीता केला जातो. गावात संयुक्त वनव्यवस्थापन समित्यांचे सहकार्य प्राप्त करुन घेऊन त्यांचे सदस्यासोबत गस्तीचा कार्यक्रम राबविला जातो. वनसंवर्धन व वनसंरक्षण कामात उत्कृष्ट काम करणाऱ्या समित्यांना पुरस्कार देण्यात येतो. सरपणाकरीता वनावरील अवलंबन कमी व्हावे या दृष्टीने वनाशेजारील गावामधील कुटुंबाना सवलतीच्या दरात एलपीजी गॅस कनेक्शन व गॅस सिलेंडरचा पुरवठा करण्यात येतो. तसेच ग्रीन आर्मीचे सदस्याचे नोंदणीचे काम सुध्दा सुरु करण्यात आले आहेत. याशिवाय वृक्षतोडीबाबत माहिती मिळण्याकरीता हॅलो फॉरेस्ट दुरध्वनी २४ तास १९२६ कार्यान्वित आहे. तसेच मागील ५ वर्षामध्ये ३ कोटी ८१ लाख रोपांची लागवड केली असुन त्यांची जोपासना करण्याकरिता जनतेमध्ये मोठया प्रमाणावर जनजागृती निर्माण करुन संगोपनामध्ये लोकांचा सहभाग प्राप्त करुन घेण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्यातील लिंगदरी व बरडा गायरान जमिनीवर वृक्षतोड करुन झालेले अतिक्रमण

**(३२) ८०२४९ (१८-०४-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्यातील लिंगदरी व बरडा या परिसरातील दोनशे एकर गायरान जमिनीवर सर्रासपणे वृक्षतोड करुन सदर जागेवर मोठया प्रमाणात अतिक्रमण करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार या प्रकरणातील वृक्षतोड करणाऱ्या तसेच अतिक्रमण करणाऱ्या विरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०६-२०१७)** :(१) हे खरे नाही.

सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्यातील लिंगदरी व बरडा येथे मोठया प्रमाणात गायरान क्षेत्र असून सदर गायरान क्षेत्राचे संरक्षण व देखरेख महसूल विभागातर्फे केली जाते. तसेच मौ.बरडा येथे वनजमीन नाही. मौ.लिंगदरी येथे ८७.५५ हेक्टर वनजमीन असून अवनत प्रकाराचे वनक्षेत्र आहे. सदर क्षेत्रामध्ये वृक्षतोड व अतिक्रमण करण्यात आलेले नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील वनक्षेत्रात केवळ ६ बिबटयांचा वावर असल्याबाबत**

**(३३) ८०७२६ (१५-०४-२०१७). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयात सुमारे १ लाख हेक्टर वन क्षेत्रात केवळ ६ बिबटयांचा संचार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र व राज्य शासन विविध प्रजातीच्या वाघांची संख्या वाढविण्याकरिता विविध उपाययोजना करीत असून नांदेड जिल्हयातील वन क्षेत्रात याबाबतच्या कोणत्याच उपाययोजना करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हयातील वन क्षेत्रात वाघांची संख्या वाढविण्याकरिता शासनाने कोणती विशेष उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०६-२०१७)** :(१) नांदेड जिल्ह्यांच्या ११२६०२.८२२ हे. वनक्षेत्र आहे. या जिल्ह्यात सद्यस्थितीत १५ व त्यापैक्षा जास्त बिबट्यांचा वावर असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) नांदेड जिल्ह्यातील वन्यप्राण्यांच्या संख्येत वाढ होण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे उपयायोजना करण्यात येत आहेत.

• वन्यप्राण्यांना वनक्षेत्रातच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याच्या दृष्टीने नैसर्गिक तलाव / पाणवठे यांचे व्यतीरिक्त कृत्रिम पाणवठे-४८, वनतळी-३१ व मातीनालाबांध-६३ इत्यादीची निर्मिती करण्यात आली आहे.

• वनालगतच्या गावांमध्ये वन्यप्राण्यांबाबत जनजागृती करण्यात येते.

• वन्यप्राण्यांनी नुकसान केल्यास प्रचलित शासन निर्णयानुसार तात्काळ नुकसन भरपाई अदा करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयातील अजयपूर वनक्षेत्राच्या वन अधिकारी व कर्मचाऱ्यांवर झालेल्या हल्याबाबत**

**(३४) ८११७३ (१९-०४-२०१७). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील अजयपूर जवळील वनक्षेत्राच्या हददीतून सुरू असलेली रेती तस्करी रोखण्यासाठी दिनांक ६ फेब्रुवारी २०१७ रोजी रात्री गस्तीवर असलेल्या वन अधिकारी व पाच कर्मचाऱ्यांना दोन ट्रक व एक टॅक्टर रेती भरून येत असल्याचे दिसताच वन अधिकाऱ्यांनी तीनही रेतीच्या गाडया थांबविल्या असता मागून आलेल्या एक वाहनातील पाच ते सहा व्यक्तींनी वन अधिकाऱ्यांची पिस्तूल घेऊन सर्वांना जबर मारहाण केली असल्याची माहिती दिनांक ७ फेब्रुवारी २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गंभीर प्रकरणाची तक्रार संबधित पोलीस ठाण्यात वन अधिकाऱ्यांनी केली असता अद्यापही आरोपींना अटक करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी सर्व आरोपींना तातडीने अटक करून त्यांच्यावर कारवाई करण्याचे निवेदन वन कर्मचारी व अधिकारी संघटनेने मा. वने मंत्री यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या गंभीर प्रकरणी शासनाने उच्चस्तरिय अधिकाऱ्यांमार्फत चौकशी केली आहे काय व त्याचा तपशिल काय आहे,

(५) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०५-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

फिर्यादी राजन तलमले, सहाय्यक वनसंरक्षक (संरक्षण पथक) यांचे तक्रारीवरुन पोलीस स्टेशन रामनगर चंद्रपूर येथे अपराध क्रमांक ३१५/२०१७ दि.०७.०२.२०१७ नुसार कलम ३९५,३९७,३५३,३३३,५०६,३६३,३४१ भांदवि सह कलम ७ क्रिमिनल अमेंडमेंड ॲक्ट, सह कलम ३ सार्वजनिक संपत्तीस हानी प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यांत आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

कारण सदर गुन्ह्यात सहभागी असलेल्या सर्व नऊ (०९) आरोपींना पोलीस विभागाकडून अटक करण्यांत आलेली असून, त्यांचे स्तरावर चौकशी सुरु आहे.

(३) हे खरे आहे.

सदर प्रकरणी आरोपीना तातडीने अटक करणेसंबधात वन कर्मचारी व अधिकारी संघटनेने मा. मंत्री (वने) यांना निवेदने दिलेले आहेत.

(४) पोलीस स्टेशन रामनगर येथे कायदेशीर रित्या गुन्हा दाखल करण्यात आला असून, अटक करण्यात आलेल्या आरोपी विरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्याकरीता मा.पोलीस अधिक्षक, चंद्रपूर यांची परवानगी प्राप्त होताच अटक केलेल्या आरोपी विरुध्द न्यायालयात दोषारोपपात्र दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याचे सहा.पोलीस निरिक्षक, रामनगर पोलीस स्टेशन चंद्रपूर यांनी कळविले आहे.

(५) फिर्यादी राजन तलमले यांचे तक्रारीवरुन पो.स्टे.

रामनगर अपराध क्र.३१५/२०१७ दि.०७.०२.२०१७ नुसार कलम ३९५, ३९७, ३५३, ३३३, ५०६, ३६३, ३४१ भांदवि सह कलम ७ क्रिमिनल अमेंडमेंड ॲक्ट, सह कलम ३ सार्वजनिक संपत्तीस हानी प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दिनांक ०७.०२.२०१७ चे १३.०३ वा.नोंद करण्यात आला.

(६) विलंब झालेला नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयात सहा वर्षात २८ बिबटयांचा झालेला मृत्यू**

**(३५) ८१२६३ (१८-०४-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयात गत सहा वर्षामध्ये २८ बिबटयांचा विविध कारणांनी मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बिबटयांचे मृत्यू रोखण्यासाठी शासनाकडून कोणत्या उपाययोजना करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-०५-२०१७) :**(१) रत्नागिरी जिल्ह्यात सन २०११-१२ ते सन २०१६-१७ या कालावधीत विविध कारणांमुळे एकूण ५४ बिबट्यांचा मृत्यू झाला आहे.

(२) व (३) बिबट व इतर वन्यप्राण्यांचे होणारे मृत्यू रोखण्याच्या दृष्टीने क्षेत्रियस्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

• वन्यप्राण्यांचे रस्ता अपघातात मृत्यू होऊ नये म्हणुन रस्त्याचे बाजुला, महत्वाच्या वळणावर सावधानतेचे फलक लावणेत आलेले आहे.

• बिबट प्रवण क्षेत्रातील गावात घडीपत्रिका वाटप करून सार्वजनिक ठिकाणी पोस्टर्स लावण्यात आले आहेत.

• जंगलामध्ये आवश्यक त्या ठिकाणी निरीक्षण मनोरे उभारण्यात आले आहेत.

• वन्यप्राण्यांच्या हालचालींचे सनियंत्रण ठेवण्याकरीता कॅमेरा ट्रॅप, जीपीएसचा वापर केला जातो.

• संरक्षित क्षेत्रातील नैसर्गिक पाणवठे, कृत्रिम पाणवठ्याची वनकर्मचाऱ्यामार्फत नियमित तपासणी करण्यात येते.

• शिकाऱ्याबाबत गोपनियरित्या माहिती संकलित करण्यात येते.

• वनक्षेत्रावर विविध योजनेतुन उपलब्ध अनुदानातून वनतळे /वनबंधारे /सिमेंट बंधारे/ पाणवठे इ कामे करण्यात येतात.

---

**भोर (जि.पुणे) तालुक्यातील पश्चिम भागातील डोंगरात वणवा पेटविल्याने हजारो एकर गवत, झाडेझुडपे व निष्पाप वन्यप्राणी जळून नष्ट होत असल्याबाबत**

**(३६) ८१२८५ (१५-०४-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर (जि.पुणे) तालुक्यातील पश्चिम भागातील डोंगरात दर उन्हाळयात वणवा पेटविल्याने हजारो एकर गवत, झाडेझुडपे त्याचबरोबर निष्पाप वन्यप्राणी जळून नष्ट होत असल्याचे दिनांक २४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वनविभागाच्या वतीने ग्रामीण भागात वनसंरक्षक समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त समित्या प्रभावीपणे काम करीत नसल्याने जनजागृती होत नाही हे लक्षात घेता याबाबत शासन प्रभावी उपाययोजना करणार वा करीत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०५-२०१७) :**(१) भोर उप विभागाच्या ताब्यात एकूण ३८,८९३ हे. वनक्षेत्र असून गेल्या वर्षात ७९ वणव्याच्या घटना घडलेल्या असून त्यामध्ये एकूण २५६.७५ हे. वनक्षेत्र जळाले आहे हे प्रमाण एकूण वनक्षेत्राच्या तुलनेत अत्यल्प आहे.
(२) हे खरे आहे.

भोर उप विभागातंर्गत एकूण २८६ वनसंरक्षण समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.
(३) वनक्षेत्रात आग लागल्यानंतर वनविभागातील कर्मचारी व वनसंरक्षण समिती मधील सदस्यांच्या संयुक्त सहभागातून लागलेली आग तात्काळ आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले जातात. तसेच समित्यांमधील सदस्य व क्षेत्रिय कर्मचारी यांचेमार्फत जनजागृतीद्वारे आगीच्या घटनेवर नियंत्रण ठेवले जाते. हॅलो फॉरेस्ट १९२६ हा टोल फ्री क्रमांक सुरु केल्याने ग्रामस्थाकडून माहिती प्राप्त होताच त्या आधारे तात्काळ घटना स्थळी पोहचून आगीवर नियंत्रण मिळवणे शक्य जाते. तसेच जागोजागी आग प्रतिबंधक पथक नेमण्यात आले आहे. तसेच आग प्रतिबंधक जाळपट्टे घेण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील जंगलांमध्ये वणव्यांच्या घटनांबाबत**

**(३७) ८१४०२ (१७-०४-२०१७). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हातील जंगलांमध्ये ९६ ठिकाणी वणवे लागून सुमारे ६१३ हेक्टर क्षेत्राला माहे एप्रिल २०१६ ते डिसेंबर २०१६ मध्ये नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वणव्यांमुळे नैसर्गिक साधनसंपत्तीच्या हानी बरोबरच जंगलातील प्राणी-पक्षांचे अस्तित्व धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी वाड्यांतील घरे वणव्याच्या आगीत भस्मसात झाली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०६-२०१७) :**(१) ठाणे वनवृत्तातील रायगड जिल्हयात अलिबाग व रोहा वनविभाग येतात. सदर वनविभागांमध्ये माहे एप्रिल २०१६ ते डिसेंबर २०१६ मध्ये जंगलात १६२ ठिकाणी वणवे लागले असून १०५४.०२ हेक्टर वनक्षेत्र जळीत झाले व वनसंपदेचे रु.१.१९९ लाखाचे नुकसान झालेले आहे.
(२) रायगड जिल्हयातील अलिबाग व रोहा वनविभागातील क्षेत्रामध्ये वणव्यामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीच्या हानी बरोबरच जंगलातील प्राणी-पक्षांचे विशेषतः ground nesting birds च्या अधिवासास धोका पोहोचतो, हे खरे आहे. परंतु त्यांचे अस्तित्व धोक्यात आले नाही.
(३) रायगड जिल्हयातील अलिबाग व रोहा वनविभागातील क्षेत्रामध्ये वणव्यामुळे आदिवासी वाडयांतील घरे आगीत भस्मसात झाल्याच्या घटना निदर्शनास आलेल्या नाहीत.
(४) व (५) वनवणवा नियंत्रण कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने कार्यवाही करण्यात येते. फेब्रुवारी पूर्वी जाळरेषा कामे पूर्ण केली आहेत. अग्नीरक्षक/ स्थानिकांचे पथकाचे मदतीने वणवा निदर्शनास येताच विझविण्यात येतो. सर्व उप वनसंरक्षक यांचे भ्रमणध्वनी क्रमांक Forest Survey of India मध्ये रजिस्टर आहेत. त्यांचेकडून प्राप्त संदेशानुसार तात्काळ वणवणवा नियंत्रणासाठी कार्यवाही करण्यात येते. प्रत्येक वन विभागात नियंत्रण कक्ष कार्यान्वित आहेत. हॅलो फॉरेस्ट हेल्पलाईन क्र.१९२६ वर प्राप्त वनवणव्याच्या संदेशाव्दारे तात्काळ कार्यवाही करण्यात येते. ठाणे वनवृत्तातील ४ अधिकारी यांनी चंद्रपूर येथे वनवणवा नियंत्रण कार्यशाळेत सहभागी होऊन विशेष प्रशिक्षण घेतले आहे. त्यांचेकडून या वनवृत्तातील सहा वनविभागातील सर्व क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना वनवणवा नियंत्रणा बाबत विशेष प्रशिक्षण दिलेले आहे. चालू वर्षी ४२ नग फायर ब्लोअर यांचा पूरवठा केला आहे. त्याचा वापर वनवणवा विझविण्यासाठी प्रभावीपणे करण्यात येतो. सर्व वनपरिक्षेत्र स्तरावर वाहने उपलब्ध असून त्याचा वनवणवा नियंत्रणासाठी व गस्तीसाठी प्राधान्याने वापर करण्यात येत आहे. ठाणे वनवृत्तात १५२८ संयुक्त वनव्यवस्थापन समित्या कार्यरत असून वनवणवा नियंत्रणासाठी त्यांचा सहभाग घेण्यात येतो. नागरिकांमध्ये वनवणव्याबाबत जनजागृती करण्यात येते. आग विझविण्याकरीता फायर बिटर, फायर रॅक इ. साहित्याचा क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना पुरवठा करण्यात आलेला आहे.

---

## हिंगणघाट व समुद्रपूर (जि.वर्धा) तालुक्यात वन विभागालगत जंगली श्वापदाचा वाढता त्रासामुळे मुनष्य हानी होत असल्याबाबत

**(३८) ८१४५८ (१७-०४-२०१७). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणघाट व समुद्रपूर (जि.वर्धा) तालुक्यात बराचशा भाग हा वन विभागालगत असून त्यामुळे जंगली श्र्वापदाचा वाढता त्रासामुळे मुनष्य हानी होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जंगली प्राण्यांचा उपद्रव रोखण्यासाठी शासनाकडून कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०६-२०१७)** :(१) वर्धा जिल्हयातील हिंगणघाट व समुद्रपूर तालुक्यामध्ये सन २०१६-१७ मध्ये मानव वन्यप्राणी संघर्षात मनुष्य जखमीच्या ९ घटना निदर्शनास आल्या असून प्रचलित शासन निर्णयाच्या तरतूदीनुसार संबंधिती जखमी व्यक्तीस नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.
(२) मानव-वन्यप्राणी संघर्ष रोखण्याच्या अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर उपययोजना करण्यात येतात.

• वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने वनक्षेत्रात कृत्रिम पाणवठे, वनतळी, वन बंधाऱ्याची निर्मिती करण्यात येऊन त्यात पाणी उपब्ध करुन देण्यात येते.
• वनांवरील अवलंबन कमी करण्याच्या दृष्टीने सबसिडीवर एलपीजी गॅस शेगडी व सिलेंडर पुरवठा केला जात आहे.
• परिक्षेत्रस्तरावर क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत नियमित गस्त करण्यात येते.
• नियमित गस्तीद्वारे वन्यप्राण्यांच्या हालचालीचे संनियंत्रण करण्यात येते.
• ग्रामीण भागात विविध माध्यमातून जनजागृती करण्यात येते.
• वन्यप्राण्यांचे होणारे संभाव्य हल्ल्यापासून योग्य ती खबरदारी घेणे व जंगलात न जाण्याबाबत सावधानातेचा इशारा दर्शक पोस्टर्स लावणेत आले आहेत.
• वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत झालेल्या व्यक्तीच्या कादेशीर वारसास, संबंधित जखमी व्यक्तीस, शेतपिक नुकसानी प्रकरणी संबंधित शेतकऱ्यास तसेच पशुहान हानी प्रकरणी संबंधित पशधनाच्या मालकास प्रचलित शासन निर्णयान्वये नुकसान भरपाई अदा करण्यात येते.
• आवश्यकता भासल्यास वन्यजीव संरक्षण (अधिनियम), १९७२ च्या नियमांतील तरतूदीच्या अनुषंगाने उपद्रवग्रस्त वन्यप्राण्याला पकडण्यासाठी पिंजरे लावण्यात येतात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### किनवट (जि.नांदेड) तालुक्यात सागवानाची अवैधरित्या तोड होत असल्याबाबत

**(३९) ८१६७६ (१७-०४-२०१७). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) किनवट (जि.नांदेड) तालुक्यात सागवानाची स्थानिक वनाधिकाऱ्यांच्या संगनमताने मोठया प्रमाणात अवैधरित्या तोड होत असल्याची बाब माहे जानेवारी २०१७ च्या दुस-या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०६-२०१७) :**(१) व (२) किनवट तालुक्यातील झेंडीगुडा नियतक्षेत्रात अवैध वृक्षतोडीची एक घटना माहे जानेवारी २०१७ मध्ये निदर्शनास आली. तथापि सदर घटना स्थानिक वनअधिकारी यांचे संगनमताने घडली हे खरे नाही. सदर घटनेत ९ साग वृक्षांची तोड झाली असुन सदर वनगुन्हयात ३ सायकली, २ करवत व ९ साग नग (घ.मी. ०.६१०) जप्त करण्यात आले व वनगुन्हा क्रमांक २/२०१७ दिनांक २४.१.२०१७ जारी करण्यात आला असुन प्रकरणात २ आरोपींना अटक केली. त्यांना दिनांक ३०.१.२०१७ पर्यंत वनकोठडीत ठेवण्यात आले. व दिनांक १३.२.२०१७ पर्यंत पोलिस कोठडी दिलेली होती.

सदर घटनेत आरोपींशी झालेल्या झटापटीत वनकर्मचाऱ्यांना दुखापत केल्याप्रकरणी किनवट पोलीसांनी भा.द.वि.चे कलम ३९५, ३५३, ३३२, ३३६, ३३७, १४३, १४७, १४८, १४९, ५०४ व ५०६ अन्वये गुन्हा क्र.२१/२०१७ दिनांक २.४.१.२०१७ गुन्हा जारी केला आहे. दिनांक १५.३.२०१७ रोजी किनवट पोलिसांनी ४ फरार आरोपीपैकी ३ आरोपीना पकडून दिनांक १८.३.२०१७ रोजी मा. न्यायालय किनवट यांच्याकडे हजर केले. त्यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी मंजूर केली दिनांक १८.३.२०१७ रोजी अर्ज करुन सदर आरोपीना दिनांक २०.३.२०१७ रोजी वन विभागाच्या ताब्यात घेवून दिनांक २१.३.२०१७ व दिनांक २२.३.२०१७ रोजी अवैध वृक्षतोडीच्या घटनास्थळी घेवून गेले असता त्यांनी अवैध वृक्षतोड केल्याचा गुन्हा मान्य केला आहे. दिनांक २२.३.२०१७ रोजी ३ आरोपींना मा.न्यायालयासमोर हजर केले असता दिनांक ३१.३.२०१७ पर्यंत न्यायालयीन कोठडी मंजूर केली त्यानंतर जिल्हा कारागृह नांदेड येथे दाखल केले. सदर गुन्हयातील ६ आरोपीपैकी आजपर्यंत ५ आरोपीना अटक करुन तपास करण्यात आला असून १ आरोपी त्या गावातील नसल्याची खात्री पटली आहे. प्रकरणी पोलीस स्टेशन किनवटकडून मा. न्यायालयात दोषारोप दाखल करण्याबाबत अपर पोलिस अधिक्षक, भोकर यांच्याकडे प्रकरण पाठविले आहे. मंजूरी मिळताच दोषारोपपत्र दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वन विभागाने माजी सैनिक व अनुकंप तत्वावरील नियुक्त कर्मचाऱ्याचे आयकर फॉर्म नंबर १६ रद्द केल्याबाबत

**(४०) ८१७४१ (१७-०४-२०१७). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वन विभागाने माजी सैनिक व अनुकंप तत्वावरील नियुक्त कर्मचाऱ्याचे आयकर फॉर्म नंबर १६ रद्द केल्याचे माहे जानेवारी २०१७ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे संबधित कर्मचाऱ्यांचा २० कोटीचा आयकर बुडाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१७-०५-२०१७)** :(१) हे अंशत: खरे आहे.

गडचिरोली वनवृत्त वगळता इतर वनवृत्तात माजी सैनिक व अनुकंपा तत्त्वावरील नियुक्त कर्मचाऱ्याचे आयकर फॉर्म नंबर १६ रद्द केल्याचे निदर्शनास आले नाही.
तथापि गडचिरोली वनवृत्तांतर्गत येणारे वनरक्षक, वाहतूक व विपणन, बल्लारशाह विभागात नियुक्त कर्मचाऱ्यांचे आयकर फॉर्म नं. १६ रद्द केल्याची बाब जानेवारी २०१७ दरम्यान निदर्शनास आली.
(२) हे खरे नाही.

वाहतूक व विपणन विभागात एकूण ८४ पदांपैकी १० कर्मचारी अनुकंपा तत्वावर कार्यरत आहेत. त्यापैकी २ कर्मचाऱ्यांना त्यांना मिळणारे कुंटुंब निवृत्ती वेतन व वेतन यांचे एकत्रित रकमेवर आयकर देय होत असल्याने त्यांना पूर्वी जारी केलेले फॉर्म नं.१६ रद्द करुन त्यांना सुधारीत फॉर्म नं.१६ जारी करण्यात आले आहे. तसेच सुधारीत फॉर्म नं.१६ प्रमाणे त्यांचेकडे थकीत असलेल्या आयकराची रक्कम रु.७११८ चा भरणा त्यांनी केलेला आहे.

तसेच वाहतूक व विपणन विभागांतर्गत ३ माजी सैनिक कर्मचाऱ्यांचे बाबतीत माजी सैनिक हे ज्या आहरण व संवितरण अधिकारी यांचे अधिनस्त कार्यरत आहेत त्यांना माजी सैनिकांच्या निवृत्तीवेतनाच्या तपशील व ते कार्यरत पदावर घेत असलेल्या वेतनाचा तपशील सामाईक करुन फॉर्म नं. १६ जारी करण्याबाबत सूचना वनसंरक्षक, वाहतूक व विपणन, बल्लारशाह यांनी दिलेल्या आहेत.या कर्मचाऱ्यांचे बाबतीत एकत्रित वेतन व भरणा केलेला आयकर याचा तपशील उपलब्ध होताच संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांचे स्तरावर फॉर्म नं.१६ सुधारीत करणेबाबत आवश्यकतेनुसार कार्यवाही करण्यात येईल.

तुर्तास तरी शासनाचा महसूल बुडाला आहे, असे म्हणता येणार नाही.
(३) वरील कर्मचाऱ्याकडून आयकर वसूलीबाबत शासन स्तरावरुन कुठल्याही बाबतीत चौकशी केली नसून चौकशी करण्याचे निर्देश सुध्दा प्राप्त झालेले नाहीत. तथापि संबंधिताकडून आयकर वसूलीची कार्यवाही वनसंरक्षक, वाहतूक व विपणन, बल्लारशाह यांचेकडून करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवीन नागझिरा व कोका (जि.भंडारा) अभयारण्यालगत गावाशेजारी सौरकुंपण लावण्याच्या प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत**

**(४१)** *८१८००* **(१८-०४-२०१७). श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवीन नागझिरा व कोका (जि.भंडारा) अभयारण्यालगत गावाशेजारी सौरकुंपणासाठी ४० लक्ष रुपयांचा प्रस्ताव वन्यजीव विभागाकडून जिल्हा नियोजन समितीकडे दोन वर्षापुर्वी पाठविण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या परिसरात वन्यप्राण्यांचा शेतशिवारांमध्ये वावर वाढला असून नागरिक व शेतकऱ्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला असल्यामुळे कोका वन्यजीव अभयारण्याला सौरकुंपण लावण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०६-२०१७)** :(१) हे खरे आहे, कोका अभयारण्याचे सीमेला लागून असलेल्या परिसरात शेतपिकाचे वन्यप्राण्यांपासून नुकसान टाळण्यासाठी तसेच वन्यप्राण्यांचे संरक्षणार्थ अभयारण्याचे १२.०० कि.मी. सीमेवर सौर कुंपण (Solar fencing) करण्याकरिता वनसंरक्षक (वन्यजीव), गोंदिया यांचे कार्यालयाकडून रु.४२.५० लक्ष रक्कमेचा प्रस्ताव दिनांक ८.०७.२०१४ चे पत्रानुसार सादर करण्यात आला होता, तथापी जिल्हाधिकारी, भंडारा यांचे कार्यालयाकडून सदर प्रस्तावास मंजूरी प्राप्त झाली नाही.
(२) व (३) डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना अंतर्गत ग्राम परिस्थितीकि विकास समिती मार्फत काही प्रमाणात सौर कुंपणाची कामे घेण्यात आली असून, नवीन नागझिरा अभयारण्यांतर्गत ३७ शेतक-यांना व कोका अभयारण्यांतर्गत ११३ शेतक-यांना सौर कुपणाचा लाभ देण्यात आला आहे. तसेच सौर कुंपणाचे काम सुरू असुन, ४० गावांसाठी सौर कुपणाकरिता रु ९७.८४ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.

---

## गोंदिया जिल्हयातील नागझिरा अभयारण्याच्या आरक्षणाची सुविधा साकोली येथे सुरु करण्याबाबत

**(४२) ८१८०२ (१८-०४-२०१७). श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागझिरा अभयारण्य गोंदिया जिल्हयात असले तरी वनविभागाचे क्षेत्रीय कार्यालय साकोली (जि.भंडारा) येथे असून अभयारण्यात जाण्यासाठी पर्यटकांना साकोली येथूनच जावे लागते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागझिरा अभयारण्यातील आरक्षणाचे कार्यालय साकोली येथून ६० कि.मी. गोंदिया व १०० कि.मी. वरील नागपूर येथे असल्याने दोन्ही कार्यालय पर्यटकांच्या दृष्टीने साकोली पासून फार अंतरावर असल्यामुळे आरक्षणाची सुविधा साकोली येथे सुरु करण्याची मागणी पर्यटक व वन्यजीव प्रेमींकडून करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये व त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, नागझिरा अभयारण्याच्या आरक्षणाची सुविधा साकोली येथे सुरु करण्याचे निर्देश शासन देणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.

नागझिरा अभयारण्यास भेट देण्याकरीता राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वरुन येणाऱ्या पर्यटकांना साकोली मार्गे पिटेझरी या प्रवेशद्वाराने जोणे सोयीचे आहे. तसेच तूमसर, तिरोडा, गोंदिया व इतर मार्गाने येणाऱ्या पर्यटकांसाठी मंगेझरी व चोरखमारा प्रवेशद्वाराची व्यवस्था करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

नागझिरा अभयारण्यास भेट देण्याऱ्या पर्यटकांकरीता www.mahaecotourism.gov.in या संकेतस्थळावर आरक्षणची सुविधा ऑन लाईनद्वारे सुरु आहे. तसेच ऑफ लाईन / स्पॉट बुकींग सुध्दा अभयारण्याच्या तिनही प्रवेशद्वारांवर उपलब्ध करुन देण्यात येते.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाणे तसेच रायगड जिल्हयात वनविभागात अपुऱ्या साधनांमुळे विविध अडचणी निर्माण होत असल्याबाबत

**(४३) ८२०२२ (१८-०४-२०१७). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे तसेच रायगड जिल्हयात वनविभागात वन्य प्राण्यांना पकडण्यासाठी असुविधा आणि औषधोपचारासाठीही पुरेशी औषधे उपलब्ध नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास प्राण्यांच्या औषधोपचारासाठी डॉक्टर्स तसेच कर्मचाऱ्यांचाही तुटवडा आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जंगलात लागलेल्या वणव्यांमुळे वनसंपदेची हानी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०६-२०१७) :**(१) व (२) वनविभागाकडे वन्यप्राणी पकडणेसाठी रेस्क्यू टिम व रेस्क्यू व्हॅन उपलब्ध असून, प्राप्त परिस्थितीनुसार वन्यजीव घटक यांचे मार्फत स्थानिक एन.जी.ओ. चे सदस्य यांच्या सहाय्याने वेळीच तक्रारीचे निवारण करण्यात येते. वन्यप्राणी जखमी असल्यास एस.पी.सी.ए प्राणी रुग्णालय, ठाणे, ठाणे महानगरपालिका यांचे अधिनस्त असलेल्या प्राणी रुग्णालयात, व संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांचेकडे नेऊन औषधोपचार करण्याची कार्यवाही करण्यात येते.

(३) व (४) हे खरे नाही, वनक्षेत्रात लागलेले वनवणवे तात्काळ विझविण्यात येऊन, वनसंपदेची हानी टाळण्यात येते. वनवणव्याबाबत माहिती मिळण्याकरिता हॅलो फॉरेस्ट दुरध्वनी २४ तास १९२६ कार्यान्वित आहे. त्याकरिता वनपरिक्षेत्र कार्यालयांना ४२ फायर ब्लोअर

मशीनचा पुरवठा करण्यात आला असून, जंगलात लागलेल्या वनवणव्यांवर प्रतिबंध करण्याचे दृष्टीकोनातून फायर टिम व फायर वॉचर, गस्त वाहने, इत्यादी माध्यमाव्दारे वनवणवा लागू नये म्हणून उपाययोजना राबविण्यात येतात.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाशिम जिल्हयातील मालेगांव तालुक्यातील पांग्राबंदी ल.पा.योजनेसाठी आवश्यक असणाऱ्या बुडीत क्षेत्र वन जमिनीच्या प्रस्तावास प्राधान्यतेने मान्यता देणेबाबत**

**(४४) ८२११६ (१५-०४-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव (जि.वाशिम) तालुक्यातील पांग्राबंदी लघु पाटबंधारे योजनेच्या बुडीत क्षेत्रात वन जमिनीची काही जागा या योजनेत जात असून सदर वनजमिनीचा प्रस्ताव मान्यतेअभावी सदर लघु पाटबंधारे योजनेचे काम ३ वर्षापासुन बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जलसंपदा विभागाकडून वन जमिनीचा प्रस्ताव केंद्रस्थ् अधिकारी (वने) नागपुर यांच्याकडे मान्यतेसाठी पाठवला असुन अदयापही तो मान्यतेसाठी प्रलंबीत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या वन जमिनीच्या प्रस्तावास प्राध्यान्याने मान्यता द्यावी यासाठी स्थानिक लोकप्रतिनीधीने दिनांक २८ जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाव्दारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०५-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.
वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वाशिम जिल्हयातील पांग्राबंदी ल.पा. योजनेच्या बांधकामाकरीता एकूण १९.०५ हेक्टर वनजमिन वळतीकरणाचा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या दिनांक १७/०१/२०१७ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेला प्रस्ताव राज्य शासनाने दिनांक २७/०२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास मान्यतेसाठी सादर केला आहे. तसेच सदर प्रस्तावासंबंधी केंद्र शासनाने दिनांक ०४/०४/२०१७ रोजीच्या पत्रान्वये उपस्थित केलेल्या त्रुटींचा पूर्तता अहवाल देखील अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी दिनांक १३/०४/२०१७ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास सादर केला आहे.
(३) हे खरे आहे.
(४) व (५) सदर प्रस्ताव राज्य शासनाने दिनांक २७/०२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये शिफारसींसह केंद्र शासनास सादर केला आहे. केंद्र शासन स्तरावरुन प्रस्तावास मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**पुणे जिल्हयातील भीमाशंकर अभयारण्यामधील झाडांची तोड होत असल्याबाबत**

**(४५) ८३२४५ (२०-०४-२०१७). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम आदिवासी दुर्गम भागातील भीमाशंकर अभयारण्यामधील झाडांची मोठया प्रमाणात वृक्षतोड होत असल्याने याबाबत चौकशी करण्याची मागणी नागरीकांनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, त्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३)असल्यास, त्यानुसार याप्रकरणी काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०५-२०१७) :**(१) हे खरे नाही.

पुणे जिल्हयातील खेड, आंबेगाव तसेच ठाणे जिल्हयातील मुरबाड या तालुक्यातील राखीव वनक्षेत्र भिमाशंकर अभयारण्यासाठी शासनाने दिनांक १६.९.१९८५ च्या अधिसूचनेप्रमाणे एकूण १३०.७८ चौ.कि.मी. वनक्षेत्र अधिसूचित केले आहे. अभयारण्यासाठी अधिसूचित क्षेत्रामध्ये कोणत्याही प्रकारच्या झाडांची तोड/ वृक्षतोड होत नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे सोनई (ता.नेवासा, जि.अहमदनगर) येथील शनैश्वर आरा गिरणी अनधिकृतरित्या व बनावट कागदपत्रांच्या आधारे सुरु असल्याबाबत**

**(४६) ८३३१२ (१५-०४-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सोनई (ता.नेवासा, जि.अहमदनगर) येथील शनैश्वर सा मिल (आरा गिरणी) गेल्या ३७ वर्षापासून बेकायदेशीर पणे सुरु असून सदर गिरणीस १९७८ साली परवाना मिळाला नंतर वेळोवेळी झालेल्या नुतनीकरणात बनावट कागदपत्रे सादर करण्यात आली असे निदर्शनास आले असून सदर मिलच्या जागा मालकीचे बनावट ना हरकत पत्र जोडले आहे.प्रत्यक्षात सदर जागा मात्र ग्राम पंचायतीची असून सदर मिलला ना हरकत प्रमाणपत्र दिलेले नाही असा खुलासा केला आहे सदर जागेचा ७/१२ चा उतारही या कागद पत्रात नाही. यासरख्या अनेक तक्रारी सदर शनैश्वर मिल बाबत आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच या मिल बाबत संपूर्ण चौकशी निष्पक्षपणे करण्यात यावी अशी विनंती उपवनसंरक्षक नगर विभाग यांनी वनसंरक्षक, नाशिक यांना केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, तदनुसार शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-०६-२०१७) :**(१) हे अंशतः खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) तक्रारीनुसार उपवनसंरक्षक, अहमदनगर यांचे स्तरावर चौकशी करुन आरागिरणी बंद करणेत आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात गेल्या वर्षभरात जंगलाला लागलेल्या आगी मुळे ३४ हजार हेक्टर जमिनीची हानी झाल्याबाबत**

**(४७) ८३५९१ (१५-०४-२०१७). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वन विभागात गेल्या वर्षभरात ४ हजार ३९७ आगीच्या घटना घडल्या त्यात ३४ हजार ४७९ हेक्टर वनक्षेत्र जळाल्याचे निदर्शनास आले जंगलात विविध कारणांनी आगी लागतात काही वेळेस जंगलाच्या आजूबाजूचे लोक आग लावून वनरक्षक येई पर्यंत पळून जातात.वन विभागाकडे ३७८ फायर ब्लोअर असून वनरक्षकाकडे ५४२ स्मार्ट फोन देखील देण्यात आलेले आहेत. तरी देखील सदर आगीचे प्रमाण कमी होत नाही याकामी आजू बाजूच्या नागरिकांना लोकशिक्षण देऊन जागृती करणे आवश्यक असून सदर काम वन विभागाकडून प्रभावीपणे होत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, तद्‌नुसार शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०५-२०१७) :**(१) सन २०१६ मध्ये ४६४१ आगीच्या घटना घडलेल्या आहेत व त्यात ३५,८३८.९४ हेक्टर एवढे वनक्षेत्र जळाले आहे. वनविभागाकडे ६३३ फायर ब्लोअर असून क्षेत्रिय कर्मचाऱ्यांना ८६०२ स्मार्ट फोन पुरविण्यात आलेले आहेत. जंगलात विविध कारणांनी आगी लागत असतात. आगीच्या घटना घडल्यावर वनक्षेत्र जळीताचे नुकसान कमी होण्यासाठी वनविभाग प्रयत्नशील असतो. तसेच जंगलाचे मानवी जीवनातील महत्व पटवून देण्याकरीता जनजागृती, जाहीरात ई द्‌वारे प्रसिध्दी करण्यात येते. तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी ग्रामसभा घेतात. भिंती पत्रके चिकटवून आगीमुळे होणारे नुकसान पटवून सांगतात. स्थानिक नागरिकांना लोकशिक्षण देऊन जनजागृती करण्यात येते. त्यामुळे वनवणवा वेळेच्या वेळी नियंत्रण होत असल्यामुळे आगीचे प्रमाण कमी झालेले नाही असे म्हणणे वस्तुस्थितीस अनुसरुन ठरत नाही.
(२) व (३) क्षेत्रिय अधिकारी त्यांचे कार्य क्षेत्रात घडणाऱ्या आगीच्या घटना संबंधाने वनगुन्हे नोंदवितात. त्यानुरुप विहित कार्यपध्दतीनुसार कार्यवाही केली जाते. प्रकरणी शासन स्तरावरुन देखील अहवाल/आढावा घेण्यात येतो.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगाव जिल्हयातील चाळीसगाव तालुक्यात वन्य जीवांचे रक्षण करण्याबाबत**

**(४८) ८३७९६ (१८-०४-२०१७). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हयातील चाळीसगाव तालुक्यात वन क्षेत्रात लागलेल्या आगीवर नियंत्रण व वन्य जीवांचे रक्षण करण्यासाठी वनविभागातर्फे १२ हजार हेक्टर क्षेत्रांपैकी तब्बल ८ हजार हेक्टरवर जाळरेषा घेण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच या तालुक्यात जवळपास १० माती व सिमेंट बंधा-यांची काम मंजुर करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंजुर करण्यात आलेली कामे सुरु करण्यात आली आहेत काय,

(४) असल्यास, सदर कामे किती कालावधीत पूर्ण होणार आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०५-२०१७)** :(१) हे खरे नाही. जळगाव वनविभागाचे एकूण ८३७५५.४८ हे. वनक्षेत्र आहे. चाळीसगाव तालुक्यात गौताळा औट्रम घाट अभयारण्यातंर्गत ६३५५.१९ हे. वनक्षेत्र असून जळगाव प्रादेशिक वन विभागातंर्गत ६७६२.५८ हे. वनक्षेत्र असून महसूल क्षेत्रालगत व रस्ता दुतर्फा ८०.७६ कि.मी. क्षेत्र यात जाळरेषा घेण्यात आल्या आहेत.

(२) चाळीसगाव तालुक्यातील, चाळीसगाव वनपरिक्षेत्रात ३ मातीबांधाची व २ सिमेंट बांधाची कामे मंजूर आहेत.

(३) होय ३ माती बंधाऱ्याची कामे पूर्ण करण्यात आली आहे.

(४) उर्वरीत २ सिमेंट बंधाऱ्याची कामे मे-२०१७ अखेर पूर्ण करण्यात येणार आहेत.

(५) विलंब झालेला नाही.

---

**कर्जत-भीमाशंकर (जि.रायगड) रा.मा.क्र ५४ या रस्त्याची कामाची निविदा मंजूर असूनही NGT च्या मान्यतेअभावी काम बंद असलेबाबत**

**(४९) ८३९०४ (१९-०४-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत-भीमाशंकर रा.मा.क्र. ५४ या रस्त्याच्या कामाची निविदा शासन निर्णय क्र. रा.मा १००५/सीआर (७७२)/पी-३ मंत्रालय दिनांक २१ फेब्रुवारी, २००५ नुसार मान्यता मिळाली असूनही काही अंशी काम सुरु करून बंद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याला वन खात्याने अंशत: मान्यता देऊनही राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण (NGT) च्या मान्यतेअभावी काम पूर्ण होऊ शकले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर /राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण (NGT) यांची मान्यता घेण्यासाठी शासन स्तरावरून अद्यापपर्यंत काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०५-२०१७) :**(१), (२) व (३) केंद्र शासनाने दिनांक २६/०९/२०१३ रोजीच्या पत्रान्वये कोथिंबे ते राज्य महामार्ग क्र.५४ वरील रायगड जिल्हा हद्दीपर्यंत या भीमाशंकर घाट रस्त्यास १०.६८२४ हेक्टर वनजमिन वळती करण्यास अंतिम मान्यता प्रदान केली आहे. सदर रस्त्यामध्ये समाविष्ट असलेली वनजमिन ही भिमाशंकर अभयारण्यापासून १० कि.मी. च्या आत असल्याने मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाने दि.२७/०४/२००५ अन्वये दिलेल्या आदेशानुसार मा.राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पश्चिम क्षेत्र, पुणे यांची मान्यता घेणे आवश्यक आहे.

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल यांनी मा.राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पश्चिम क्षेत्र, पुणे येथे अर्ज क्र.१५/२०१७ दाखल केले आहे. सद्य:स्थितीत सदर प्रकरण मा.राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाकडे न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## प्रतापगडच्या (जि. सातारा) पायथ्याशी वन विभागाच्या अखत्यारित असलेल्या जमिनीवर अतिक्रमण झाल्याबाबत

**(५०) ८४६२९ (१९-०४-२०१७). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रतापगडच्या पायथ्याशी असलेल्या अफजल खानाच्या कबरी भोवती वन विभागाच्या अखत्यारित असलेल्या जमीनीवर अतिक्रमण झाले असल्याने ती तातडीने हटवण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिनांक २ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनाच्या वन विभागाला दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अतिक्रमणे तातडीने हटविण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व ती अतिक्रमणे हटवली आहेत काय,
(३) सदरहू अतिक्रमणे अद्यापही हटवली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०५-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक २५ जानेवारी, २०१७ रोजी अवमान याचिका क्र.२६७/२०१० (मूळ याचिका क्र.१४१/२००७) प्रकरणी प्रतापगडाच्या पायथ्याशी वनक्षेत्रावर असलेले अनाधिकृत बांधकाम हटविण्याचे अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची सविस्तर माहिती मा.न्यायालयात सादर करण्याचे आदेश दिलेले आहेत.

(२) व (३) प्रतापगडाच्या पायथ्याशी वनक्षेत्रावर असलेली अनाधिकृत बांधकामे जिल्हाधिकारी, सातारा, पोलिस अधीक्षक, सातारा व उप वनसंरक्षक, सातारा यांनी संयुक्तपणे कार्यवाही करुन हटविण्यासंदर्भात मा.मंत्री (वने) यांचे अध्यक्षतेखाली दि.३०/०३/२०१७ रोजी आयोजित बैठकीत निर्देश दिले होते. तथापि, मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी एसएलपी क्र.९६५४/२०१७ मध्ये मा.उच्च न्यायालयात दाखल अवमान याचिकेच्या अनुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीस दि.२७/०३/२०१७ रोजीच्या आदेशान्वये स्थगिती दिली आहे.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.